अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | शनिवार, दि.१८ फेब्रुवारी २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : १४१ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

शिवसेना शिंदेंचीच

निवडणूक आयोगाने दिला ठाकरेंना धक्का

✔ सुराज्य/विशेष प्रतिनिधी

एकीकडे दिवसभर सर्वोच्च न्यायालयातील सत्तांतराच्या वैधतेवर कायद्याचा किस पडत असताना दुसरीकडे शुक्रवारी सायंकाळी मात्र निवडणूक आयोगाने आपला निर्णय जाहीर करत हिंदुहृदयसम्राट स्व.बाळासाहेब ठाकरे यांनी स्थापन केलेली शिवसेना ही त्यांचे सुपुत्र उध्दव ठाकरे यांची नसून ती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीच असल्याचा निकाल देत ठाकरे गटाला जोर का झटका दिला. त्यामुळे आता शिवसेनाही शिंदेंची आणि शिवसेनेचा धनुष्यबाणही शिंदेंचाच झाला आहे. त्यामुळे शिंदे गटात जल्लोष सुरू झाला असून ठाकरे गटात मात्र सन्नाटा पसरला आहे.

बहुमताच्या आधारावर झाला निर्णय

दरम्यान निवडणूक आयोगाने ठाकरे आणि शिंदे गटाला बाजू मांडण्यासाठी फर्मावले. शिवसेनेतील पदाधिकाऱ्यांचा कोणाला पाठिंबा आहे? ते सिध्द करण्यास दोन्ही गटाला सांगण्यात आले. त्यानुसार दोन्ही गटांनी आपापल्या पाठिंब्याची पत्रे, प्रतिज्ञापत्रे निवडणूक आयोगाला सादर केली. या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर शिवसेनेतील सर्वाधिक पदाधिकाऱ्यांचा पाठिंबा हा शिंदे गटाला असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर निवडणूक आयोगाने बहुमताच्या आधारे शिवसेना ही शिंदेंचीच असल्याचे जाहीर केले.

हा बाळासाहेबांच्या विचारांचा विजय

लोकशाहीचा आणि भारतीय घटनेचा हा विजय आहे. हा बाळासाहेबांच्या विचारांचा विजय आहे. बाळासाहेबांचे विचार घेऊन आम्ही पुढची वाटचाल करू. आमचा निवडणूक आयोगावर विश्वास होता. त्यांनी योग्य निर्णय घेतला. आम्ही त्यांचे आभारी आहोत. आम्ही बंड केले होते. त्यानंतर कायदेशीर लढाईही लढली. आम्ही निवडणूक आयोगाकडे सगळी कागदपत्रे सादर केली होती.

- एकनाथ शिंदे (मुख्यमंत्री)

बाळासाहेबांचा विचार ज्यांच्याकडे तीच खरी शिवसेना



हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांवर चालणारे एकनाथ शिंदे यांच्या पक्षाला शिवसेनेचे नाव आणि धनुष्यबाण चिन्ह मिळाले आहे ही आनंदाची गोष्ट आहे. मी एकनाथ शिंदे आणि इतर सर्व मंडळींचे अभिनंदन करतो. आम्ही पहिल्या दिवसापासून हेच सांगत होतो की शिवसेना ही विचारांची शिवसेना आहे. कुणीही खासगी मालमत्ता म्हणून शिवसेनेवर अधिकार सांगू शकत नाही. बाळासाहेबांचा विचार ज्यांच्याकडे तीच खरी शिवसेना; असे आम्ही सांगत होतोच. निवडणूक आयोगाने यावरच शिक्कामोर्तब केले.

- देवेंद्र फडणवीस (उपमुख्यमंत्री)

नाव जपा

नाव आणि पैसा. पैसा येतो, पैसा जातो, पुन्हा येतो. पण एकदा का नाव गेलं की परत येत नाही, ते येऊ शकत नाही. काळ्या बाजारातसुद्धा मिळायचं नाही. म्हणून नावाला जपा. नाव मोठं करा. बाळासाहेबांनी दिलेला शिवसेना' हा विचार किती अचूक होता, ते आज पुन्हा एकदा कळलं.

- राज ठाकरे (मनसे प्रमुख)

निवडणूक आयोगाने मारली मेख

शिवसेना पक्षाने २०१८ मध्ये पक्षाच्या घटनेत केलेले बदल लोकशाहीशी सुसंगत नाहीत, असे निरीक्षण निवडणूक आयोगाने नोंदवले आहे. पक्षांतर्गत निवडणुका न घेता पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या. त्यामुळे उद्धव ठाकरेंच्या नेतृत्वाखालील शिवसेना पक्षाने निवडणूक आयोगाचा विश्वास गमावला, असा निष्कर्ष काढून निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष शिंदे यांच्या हवाली केला.

अशी झाली चूक

सन २०१८ मध्ये उध्दव ठाकरे यांनी शिवसेना पक्षाच्या घटनेत बदल केला. हा बदल निवडणूक आयोगाला कळवण्यात आला नाही. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी बनवलेल्या १९९९च्या पक्षाच्या घटनेत असलेले पक्षांतर्गत लोकशाही निकष बदलण्यात आले. तेव्हा बाळासाहेब ठाकरेंनी पक्षाच्या घटनेतील बदल निवडणूक आयोगाकडून संमत करुन घेतले होते. पण २०१८ मध्ये झालेले बदल निवडणूक आयोगाला कळवण्यात आले नाहीत. हीच चूक उध्दव ठाकरे यांना भोवली.

गेल्या जून महिन्यामध्ये विधानपरिषदेची निवडणूक संपता क्षणीच त्यावेळच्या महाविकास आघाडी सरकारमध्ये नगरविकास मंत्री असणारे शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी ४० आमदारांना सोबत घेवून बंड केले. नाट्यमय घडामोडीनंतर बंड थोपवणे अशक्य झाल्यामुळे उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर भाजपच्या मदतीने शिंदे यांनी सरकार स्थापन करून मुख्यमंत्रिपद मिळवले. दरम्यान, शिंदे यांनी शिवसेनेवर दावा केला. त्यामुळे हा विषय निवडणूक आयोगात पोहचला.

चोरांना चोरी पचणार नाही : उध्दव ठाकरे

मुंबईः शिवसेना नाव व धनुष्यबाण चिन्ह गेलं म्हणून खचून जाऊ नका, जिद्द सोडू नका. चोरांना चोरी पचणार नाही, असा विश्वास उद्धव ठाकरे यांनी समर्थकांना शुक्रवारी दिला. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निकालानंतर उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन भूमिका स्पष्ट केली.

ते म्हणाले, त्यांना फोटो चोरावा लागतो. चिन्ह चोरावं लागतं. त्या नार्मदांना चोरी पचणार नाही. गद्दारांना मोठं करणारी जनता माझ्या सोबत आहे. त्यांना आम्ही जड गेलो. त्यामुळेच त्यांनी पैशाच्या जोरावर केंद्रीय निवडणूक आयोगाचा निकाल विकत घेतला. जनतेला हे पटणारे नाही. जनताच त्यांना त्यांची जागा दाखवून देईल. शिवसेनाप्रमुखांनी पुजलेला धनुष्यबाण आजही माझ्याकडेच. १०० कौरव एकत्र आले तरी पांडव जिंकले. महाराष्ट्रातील जनता याचा बदला घेतल्याशिवाय राहणार नाही. सर्वोच्च न्यायालयात आम्ही जिंकू अशी अपेक्षा. केंद्रीय मंत्री म्हणाले होते द्या ब्रेकींग न्यूज. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही चिन्ह व नाव शिंदे गटाला मिळेल. हे त्यांना आधीच कसे कळाले. आज धनुष्यबाण ओरबाडून घेतले तरी तुम्हाला मिळणार नाही. चोरी पचली तरी चोर चोरच असतो. आम्ही सर्वोच्च न्यायालयात जाणार. तोवर त्यांना पेढे खाऊ द्या. शिवसैनिकांनो खचून जाऊ नका. हिंमत सोडू नका, असे चोर चोरी पचवू शकणार नाही, असा टोला उद्धव ठाकरे यांनी लगावला.

मेसेज करण्यास सांगून केला विनयभंग; पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : तुमच्या मुलीला मला मेसेज करायला सांगा असे म्हणत पीडित तरुणीच्या आईला दमदाटी करून विनयभंग केल्याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात एका तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

श्रीकृष्ण शिवाजी बनसोडे (वय-२३, रा.सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव आहे. ही घटना दि.१५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास सोलापुरात घडली.याप्रकरणी पीडित अल्पवयीन मुलीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पिडित मुलीची आई, वडील आजी घरी असताना वरील संशयित आरोपी हा सकाळच्या सुमारास घराजवळ येऊन पीडित तरुणीच्या आईला म्हणाला की, तुमच्या मुलीला मला मेसेज करायला सांगा मेसेज नाही केला तर मी तुमच्या घरावर दगड फेक करेल, असे म्हणून पीडीत तरुणीच्या आईला दमदाटी केली आहे. या घटनेची नोंद एमआयडीसी पोलीस ठाण्यात झाली असून, या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कुकडे हे करीत आहेत.

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार

✔ **सोलापूर** : तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून अत्याचार केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.संतोष सिध्दय्या स्वामी (रा. सोलापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचे नाव आहे.

याप्रकरणी पीडित तरुणीने एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिच्यासोबत असलेले फोटो प्रसारित करण्याची धमकी देत तुझे प्रेम संबंध तुझ्या घरात सांगतो असे म्हणत वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवत अत्याचार केला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. या घटनेची एमआयडीसी पोलीसात झाली असून पुढील तपास पोसई वळसंगे हे करीत आहेत.

कागदोपत्री तोडणी, दुसऱ्या ग्राहकांच्या नावाने वीज जोडणी

सोलापूर महावितरणच्या तीन अभियंत्यांसह कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा

✔ **सोलापूर** : महावितरणच्या मुख्य कार्यालय मार्फत थकबाकी पोटी कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या ग्राहकांच्या विजेच्या कनेक्शनची राज्यभर तपासणी मोहीम सुरू असून यामध्ये सोलापूर जिल्ह्यात कायमस्वरूपी बंद करण्यात आलेल्या विज ग्राहकांच्या प्रत्यक्ष जागेवर विद्युत पुरवठा सुरू आहे किंवा नाही याबाबत पडताळणी करण्यात आली. यामध्ये गैरकृत्य निदर्शनास आल्याने सोलापूर महावितरणच्या तीन अभियंत्यांसह कर्मचाऱ्यांवर महावितरणचे संचालक (संचलन) आणि कार्यकारी संचालक (वितरण) यांनी कारवाईचा बडगा उगारला असून यामध्ये तीन अभियंत्यांना निलंबित करण्यात आले असल्याने सोलापूर जिल्ह्यातील महावितरणच्या सर्व विभागातील अधिकारी वर्गात धडकी भरली आहे .

सोलापूर जिल्ह्यातील ज्या विज ग्राहकांनी विजेची थकबाकी भरली नाही अशा विज ग्राहकांचा विजेचा पुरवठा कायमस्वरूपी खंडित केला होता . परंतु या विज ग्राहकांच्या जागेवरती विजेचे कनेक्शन चालू आहे की नाही यासाठी महावितरण मुख्यालय मार्फत तपासणी मोहीम हाती घेतली होती. तेव्हा तपासणी दरम्यान पथकाला चुकीच्या पध्दतीने विज ग्राहकांचा विद्युत पुरवठा कायमस्वरूपी बंद केल्याचे दाखवून. तसेच विजपुरवठा खंडित केल्याची संगणक प्रणालीत नोंद असतानाही प्रत्यक्ष जागेवर मिटर द्वारे दुसऱ्या ग्राहकांच्या नावाने वीज कनेक्शनची जोडणी देऊन प्रत्यक्षात विद्युत पुरवठा सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे . त्यामुळे आपल्या हाताखालील अधिकारी, कर्मचारी यांचेवर आपले नियंत्रण ठेवण्यात अपयशी ठरल्याने थकबाकीदार ग्राहकांची वसुली न करता थेट दुसऱ्यांच्या नावावरती विजेचे कनेक्शन देऊन महावितरण कंपनीचे नुकसान केले आहे. म्हणून महावितरणचे संचालक (संचलन) संजय ताकसांडे आणि कार्यकारी संचालक (वितरण) अरविंद भादीकर यांनी पंढरपूर उपविभागाचे कार्यकारी अभियंता . टेंभुर्णी उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता. आणि बार्शी बी झोन शाखा कार्यालयाचे सहायक अभियंता यांना तडकाफडकी निलंबित केले आहे. तसेच या तपासणी मोहिमेत वाशिम जिल्हा, औरंगाबाद जिल्हा, आणि पुणे ग्रामीण, यांचा ही समावेश असून महावितरण मधील एज्युक्युटी इंजिनिअर ३, उपकार्यकारी अभियंता ६, सहाय्यक अभियंता ८ आणि जनमित्र ४७ असे मिळून एकूण ६४ जणांना निलंबित केले आहे. महावितरण मुख्यालय पातळीवरून कोणत्याही प्रकारची आगाऊ न देता व महावितरण कंपनीच्या सेवाविनियाचा तथा कायदेशीर तरतुदींचा अवलंब न करता कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता, जनमित्र यांना तडकाफडकी निलंबित केले आहे.

'जीवनाची हमी' तपासणीत आढळले हृदयाला छिद्र

मुंबईत वेळेवर शस्त्रक्रिया झाल्याने जीवदान

✔ **अक्कलकोट** : जिल्हा परिषदेकडून जीवनाची हमी बालमृत्यू हे अभियान राबविले. या अभियानात एका मुलाच्या हृदयाला छिद्र असल्याचे आढळले.त्या मुलावर मुंबईतील रुग्णालयात शस्त्रक्रिया करण्यात आली. वेळीच शस्त्रक्रिया व उपचार झाल्याने त्याचा जीव वाचला.

सोलापूर जिल्हा परिषदेने काही महिन्यांपूर्वी आरोग्य विभाग व महिला बाल कल्याण विभागाच्या संयुक्त विद्यमाने सीईओ दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून 'जीवनाची हमी, बालमृत्यू कमी' हे अभियान सुरू केले होते.या अभियानात काही बालकांची वेळीच तपासणी व उपचार केल्याने त्यांचे प्राण वाचले. अक्कलकोट येथील अंगणवाडी केंद्रातील आरोग्य तपासणीमध्ये प्रसाद गणेश विभुते, वय अडीच वर्ष राहणार संभाजी चौक अक्कलकोट या मुलाला हृदयदोष आढळला.राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमातील वैद्यकीय अधिकारी डॉक्टर नीरज जाधव, विनोद डांगे, आरोग्य सेविका स्वरूपा चव्हाण आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ अशोक राठोड यांनी दोन महिन्यांपूर्वी या मुलाची तपासणी केली होती.प्रसाद यास मुंबई येथील बालाजी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले.त्याच्यावरील हृदय शस्त्रक्रिया गुरुवारी पूर्ण झाली.

आता प्रसाद ची तब्येत चांगली आहे.हे शस्त्रक्रिया शासकीय योजनेतून मोफत झाली आहे. तसेच भायखळा बालाजी हार्ट हॉस्पिटल मुंबई येथील सर्व डॉक्टर्स व कर्मचारी यांच्या सहकार्याने शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडली. सदरील जागरूक बालक,सुदृढ बालक कार्यक्रमांतर्गत सोलापूर जिल्ह्यातील अनेक तालुक्यातील बालक या बालाजी हॉस्पिटल मध्ये अँडमिट आहेत. त्याच्या नातेवाईकांना लागणाऱ्या कागदपत्राची माहिती व पूर्तीसाठी प्रा.आ. केंद्र मैंदर्गीच्या अधीप्रीचारिका अलका विभुते तेथे उपस्थित असल्याने बालकांच्या पाल्यांना सहकार्य करून अडी अडचणी विचारून संबधित अधिकाऱ्यांशी बोलून त्यांच्यामार्फत मार्गदर्शन केले.डॉक्टर द्वारकानाथ कुलकर्णी यांचे सदरील ऑपरेशन करण्यासाठी अनमोल सहकार्य लाभले. शस्त्रक्रिया व्यवस्थित पार पडल्याने त्याबद्दल डॉक्टर द्वारकानाथ कुलकर्णी व समस्त बालाजी हॉस्पिटल ट्रस्टचे बालकांच्या नातेवाईक प्रा.आ. केंद्राच्या अधिपरीचारीका अलका विभुते (रुग्णाची अत्या) यांनी सर्व टीम चे आभार मानत समाधान व्यक्त केले.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



'त्यांची' सोबत की नौबत, हे उशिरा कळलं!

कल्याण
790-67-566

मेन बाजार
229-36-466

अतिवृष्टीच्या नुकसान भरपाईचे १५० कोटी लवकरच शेतकऱ्यांच्या खात्यावर

● सोमवारपासून चावडीवर लावणार याद्या : जिल्हाधिकारी शंभरकर

✔ सुराज्य/सोलापूर

सप्टेंबर आणि ऑक्टोंबर महिन्यात झालेली अतिवृष्टी आणि सततच्या पावसाची नुकसान भरपाई संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही शासनाने युध्दपातळीवर सुरु केली आहे. शासनाकडून तालुक्यांच्या तहसिलदारांना युजर आयडी आणि पासवर्ड मिळाला असल्याने अतिवृष्टीने बाधित झालेल्या उत्तर सोलापूर, अक्कलकोट आणि दक्षिण सोलापूर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांच्या खात्यावर लवकरच १५० कोटीची नुकसान भारपाई जमा केली जाणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

तहसिलदारांकडून पात्र शेतकऱ्यांच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत. शासनाने नव्यानेच विकसित केलेल्या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी तहसिलदारांना

युजर आयडी आणि पासर्वड शासनाने दिले आहेत. त्यावरुन यादी अपलोड झाल्यानंतर तीच यादी प्रत्येक गावच्या ग्रामपंचायत कार्यालयात लटकविण्यात येणार आहे. यादीत नाव असलेल्या शेतकऱ्यांनी जवळील आपले सरकार सेवा केंद्र किंवा बँक शाखेत आधार कार्ड, कर्ज खात्याचे व बचत खात्याचे पासबुक आणि यादीमध्ये आपल्या नावासमोरील नमूद असलेला विशिष्ट क्रमांक घेऊन जायचे आहे. ऑगस्ट ते ऑक्टोंबर २०२२ या काळात सततच्या पावसाने १ लाख ८० हजार ४२८ शेतकऱ्यांचे १ लाख २६ हजार ३५१ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले. शासन निकषानुसार शेतकऱ्यांना एकूण २२४ कोटी २९ लाख ७२ हजार रुपयांची भरपाई मिळणे अपेक्षित आहे. शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण शेतकऱ्यांनी करुन घ्यावे.

शेतकऱ्यांसाठी ही सेवा निशुल्क असेल. शिवाय आधार प्रमाणीकरण करतेवेळी काही विसंगती आढळल्यास पोर्टलवर असहमतीचे बटन दाबून तक्रार शेतकऱ्यांना नोंदविता येईल. ग्रामसेवक व तलाठ्यांना शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

शेतकऱ्यांना मदत देण्याचे निकष शासनाने बदललेले आहेत. आता शासन स्तरावरुनच शेतकऱ्यांच्या बँक खात्यात मदत निधी जमा होईल. सततचा पाऊस आणि अतिवृष्टीने बाधीत झालेल्या १ लाख ६१ हजार ४३० शेतकऱ्यांना २६८ कोटी ४७ लाख ५ हजार रुपयांची मदत मिळणार आहे.

८६ हजार ८८२ शेतकऱ्यांना १०५ कोटी ९२ हजार ३२६ रुपयांची भरपाई मिळाली आहे. अतिवृष्टीने बाधित झालेल्या २५ हजार ६७९ शेतकऱ्यांना ४० कोटी ५३ लाख ४९ हजार रुपये मिळाले. सततच्या पावसाने बाधीत झालेल्या ६६ हजार ५६४ शेतकऱ्यांना ११७ कोटी २६ लाख ६२ हजार रुपयांच्या मदतीची प्रतिक्षा आहे. अतिवृष्टीने बाधित झालेल्या ९४ हजार ८६६ शेतकऱ्यांना १५१ कोटी २० लाख ४० हजार रुपयांची मदत मिळणार आहे

दैवाने दिले, कर्माने नेले...

महाराष्ट्राच्या राजकारणाला शुक्रवारी सायंकाळी राजकीय भूकंपाचा जबर धक्का बसला. त्या धक्क्याने केवळ मुंबईतील 'मातोश्री'लाच नव्हेतर गेली साठ वर्षे शिवसेनाप्रमुख बाळसाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेसाठी ज्यांनी ज्यांनी म्हणून रक्त सांडले, लाठ्या-काठ्या खाल्ल्या,रात्रंदिवस कष्ट उपसले,त्या शिवसेनेच्या निष्ठावंत नेत्यांना, कार्यकर्त्यांना मोठा मानसिक धक्का बसला असणारच. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना आणि धनुष्यबाण बंडखोरी केलेले मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला बहाल करून टाकले. त्यामुळे शिवसेनेचे रिमोट कंट्रोलर उद्धव ठाकरे यांच्या पक्षप्रमुखपदाला आणि राजकीय अस्तित्वालाच सुरूंग लागला आहे. बाळासाहेब यांच्या उतारवयात शिवसेनेची सूत्रे उद्धव यांच्याकडे आली. बाळासाहेब यांच्यासह भाजपा नेते स्व.प्रमोद महाजन व गोपीनाथ मुंडे यांच्या फार्म्युल्यानुसार भाजप-शिवसेना युती अभेद्य राहिली. १९९५ ला युतीचे राज्य आले. १९९९ मध्ये युतीची सत्ता गेली. पुढची तब्बल १५ वर्षे काँग्रेस प्रणित आघाडीने राज्यावर सत्ता गाजवली परंतु पुढे २०१४च्या मोदी लाटेत आघाडीच्या सत्तेची पडझड झाली आणि लोकांनी पुन्हा युतीला संधी दिली. देवेंद्र फडणवीस यांनी पाच वर्षे मनसोक्त सत्ता उपभोगली. पुढे २०१९ लाही जनतेने युतीलाच बहुमत दिले पण सत्तेच्या वाटणीवरून फडणवीस व ठाकरे यांच्यात भिनसले. मनाप्रमाणे सत्तेचा वाटा मिळत नाही म्हटल्यानंतर ठाकरे यांनी भाजपशी काडीमोड येत वेगळी वाट धरली. बाळासाहेबांनी हयात असेपर्यंत ज्यांचा निषेध केला,त्या दोन काँग्रेसशी हातमिळवणी करून उद्धव यांनी महाविकास आघाडी उभी केली आणि ते मुख्यमंत्रीपदाच्या गादीवर बसले. ठाकरे यांची ही कृती फडणवीस यांना सहन झाली नाही. शिवसेनेत कधी एकदा ठिकरा टाकू,या रागाने फडणवीस पछाडलेले होते. अखेर ती वेळ त्यांच्यापर्यंतच चालून आली. शिवसेनाच फुटली.शिवसेनेत नाराज असणारे एकनाथ शिंदे हे फडणवीस यांच्या गळाला लागले. एक-दोन नव्हे तर ४० आमदार शिंदे यांच्या मागे गेले. ही इतकी मोठी बंडखोरी पाहाता शिवसेनेतील आमदार उद्धव यांच्यावर नाराज होते,हे स्पष्ट झाले. काँग्रेससोबत जाण्याची भूमिका त्यांनाही अमान्य होती. बंडखोरीच्या माध्यमातून अस्वस्थतेचा विस्फोट

झाला आणि उद्धव यांची खुर्चीही मोडून पडली. गुरूची विद्या गुरूला,अशी म्हण आहे.त्यानुसार एकनाथ शिंदे हे ठाकरे यांना धडा शिकवत मुख्यमंत्री झाले. वास्तविक पाहता बाळासाहेबांप्रमाणे सत्तेपासून लांब राहात एक सिनिअर व निष्ठावंत नेता म्हणून उद्धव यांनी आयाडीत तरी शिंदे यांना मुख्यमंत्रीपदाचा मान द्यायला हवा होता परंतु तेवढा मनाचा मोठेपणा त्यांनी दाखवला नाही. एकीकडे स्वगृहातील वणव्याची धग तर बाहेर फडणवीस यांचा राग. अशा कात्रीत उद्धव सापडले.शिंदेंच्या बंडखोरीची लागण राज्यभर झाली. निम्मीच्या निम्मी शिवसेना फुटली. मुंबई महापालिका ताब्यात घेण्याची भाजपची रणनीती सुरू झाली. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत महाआघाडीशी जागा वाटपांचा आणि पुढच्या सत्तेतील 'प्रपंच' जमेल का? ही चिंता खुद्द ठाकरे समर्थकांना लागून होती परंतु सांगणार कोण? या चिंतेने त्यांचेही मन पोखरून चालले होते. अखेर दणका बसलाच.आयोगातही उद्धव यांची डाळ शिजली नाही.पक्ष आणि चिन्हच गेल्याने उद्धव यांच्या हाती राहिले काय? तेलही गेले,तूपही. हाती आले धुपाटणे. अशी गत उद्धव यांची झाली आहे.सेना भवनचा ताबा आता शिंदे घेतील. तेव्हा उद्धव यांच्या हाती केवळ 'मातोश्री' राहील. इतकेच नाही तर आता इथून 'मातोश्री'वर ते एकटेच असतील. कारण घर फिरल्यानंतर घराचे वासेही फिरतात. उद्धव यांच्या भोवती असणारा लोंढा शिंदे यांच्याकडे वळण्याची शक्यता अधिक दिसते. पक्ष आणि चिन्ह मिळाल्याने एकनाथ शिंदे हे आता किंगमेकर होतील.पक्षाची ध्येय धोरणे तेच ठरवतील.शिवाय त्यांच्या हाती सत्ताही आहे.वळणाचे पाणी वळणावर म्हणतात,त्याप्रमाणे राजकारणातील लोंढेंच्या लोंढे सत्तेकडेच वळत असतात. उद्धव यांच्यावर हुकूमशहाचा आरोप बंडखोरांमधील अनेक आमदारांनी केला. अजूनही वेळ गेलेली नाही.आम्ही 'मातोश्री'वर जायला तयार आहे,अशी भूमिका काही बंडखोरांनी घेतली होती.त्याचवेळी चतुराई दाखवून उद्धव यांनी साऱ्यांना सामावून घेतले असते तर ही वेळ आली नसती. उलट बंडखोरांना इषारे देत राहिले. त्यात आदित्य ठाकरे आणि संजय राऊत यांनी समझोता घडवून आणण्याऐवजी वाटेत काटेच पेरत राहिले. करू नये तो व्यापार केल्यानंतर एखाद्याची काय गत होते,याचा धडा संतांनी दिला आहे. उद्धव यांनी राज्याने दिलेल्या बहुमताचा अनादर करून सत्तेसाठी राजकीय स्वैराचार केला. त्याचे हे परिणाम आहेत. आता जवळ कुणी असेल का नसेल, हे येणारा काळच सांगेल. उद्धवजी आता परिणाम भोगत बसा. आयोगाच्या निर्णयाने शिंदे-फडणवीस यांचा मार्ग मोकळा झाला पण महाविकास आघाडीचे शिल्पकार शरदराव यांची डोकेदुखी वाढली आहे. आघाडीतील एक पान गळून पडले.पुढे काय? बघत राहू. 'दैवाने दिले, कर्माने नेले', यालाच म्हणतात.

आध्यात्मिक

महाशिवरात्रीचे महात्म्य

महाशिवरात्र हे सर्व सणांचे उगमस्थान आहे. परमपिता परमात्याचा हा दिव्य अवतार दिवस. परमात्मा शिव भगवंताचे सर्व मानव प्राण्यांना अज्ञानाच्या अंधःकारातून शांतमय प्रकाशात येण्यासाठी जे मार्गदर्शन केले, त्या कर्तव्याची आठवण म्हणजे शिवरात्र होय.

महाशिवरात्री चे महात्म्य काय ? रात्र हे अज्ञान, तमोगुणाचे प्रतीक आहे म्हणून द्वापार आणि कलियुगाच्या अज्ञानाला रात्र म्हटले आहे. कलियुगाच्या अंती बहुतेक माणसे दुःखी पतित होतात. अज्ञान निद्रेत झोपून राहतात. धर्माला ग्लानी येते, विषयविकारामुळे माणसे अंध होतात शिव परमात्मा या सृष्टीवर जन्म घेतो. अन्य सर्वांचा जन्मोत्सव तर जन्मदिन म्हणून साजरा केला जातो. शिवपरमाला अवतरीत होऊन ज्ञान प्रकाश देतो. कलियुग व तमोगुणाच्या जागी जागात सत्ययुग व सत्वगुणाची स्थापना होते आणि अज्ञानरुपी अंधःकाराचा तसेच विकासाचा नाश होतो. शिवपरमात्माच्या कृपेने हा अंधःकार नाहीसा होतो. म्हणून शिवरात्री हिरेतुल्य आहे. कलियुगाचा अंत व सत्य युगाचा प्रारंभ या दोन युगांच्यामधील मध्यबिंदू साधणारा हा समय असतो या युगास 'पुरुषोत्तम संगम युग' असे म्हणतात.

आपले विचार मन बुध्दी, परमात्मा शिवाच्या ठिकाणी समर्पण करुन त्याच्याशी लिनता साधणे, हा महाशिवरात्रीच्या सणाचा वास्तविक अर्थ आहे. सुख, दुःख, मान-अपमान, राग, लोभ, स्नेह, मत्सर या गोष्टी व्यक्तींच्या मानसिक प्रवृत्तीवर अवलंबून असतात. आजच्या विज्ञान युगातील महाशिवरात्रीचे महत्व कमी झालेले नाही. शिवरात्र हे एक शिवव्रत असून, त्यात शिवाची उपासना, जागरण, अभिषे, पुजा, जप आदीचा अंतर्भाव आहे. 'शिव' याचा अर्थ शुभ, समुद्र, मोक्ष, आनंद असा आहे. 'महाशिवरात्र' हा पुण्य पर्वकाल होय.

महाशिवरात्री दिवशी भक्तगण उपवास व्रत का करतात? उपवासाचा अर्थ 'उप' म्हणजे जवळ आणि 'वास' म्हणजे राहणे, मनाने आणि बुध्दीने परमात्म्याच्या सान्निध्यात राहणे म्हणजेच उपवास करणे होय.

परमात्मा शिव सर्व मनुष्य आत्म्यांना ईश्वरीय आदेश देतात की, सतत मन आणि बुध्दीने योगयुक्त होऊन माझे स्मरण करा म्हणजे तुमच्या आत्म्याची जन्म-जन्मांतराची पापे नष्ट होतील व तुमचा आत्मा सुवर्णप्रमाणे सत्वप्रधान बनेल. मनाने, वाचेने आणि कर्माने सतत माझे ज्ञानार्जन करुन आपल्या व्यवहारी जीवनामध्ये कर्मयोगी बनून, कर्तव्य परायण बना, हे मत आचरणात आणणे म्हणजे उपवास करणे होय. महाशिवरात्र माघ वद्य चतुर्दशी साऱ्या भारत देशात महाशिवरात्र म्हणून साजरा केला जातो.

वेदकाळापासून शिवोपासना भारतात रुढ आहे. ब्रह्म हा सृष्टीचा निर्माता, विष्णू रक्षणकर्ता तर शंकर हा संहारक देवता, शंकराला 'रुद्र' म्हणून संबोधतात. रुद्राची कृपा म्हणून शिवाची उपासना सुरु झाली ती संबंध भारतभर प्रसार पावली. मानवाच्या मुखातून नकळत जरी शिवाचे नाव प्रगट झाले तरी त्याचे पाप नाहीसे होते. लोखंडाला नकळत परिसाचा स्पर्श झाला तरी त्याचे जसे सुवर्णात रुपांतर होते, तसे मुखातून नकळत हरिनाम प्रगट झाले तरी जीवन आनंदमय बनून जाते. नाम म्हणजे अंतःकरणापासून, हृदयापासून प्रगटलेले प्रेमच असते. हे प्रेम भगवंताच्या चरण कमलापर्यंत जाऊन स्थिरावले. त्यामुळे भगवंताचा आशीर्वाद लाभतो, नामामुळे भवसागरातून तरुण गेलेली अनेक उदाहरणे आहेत. अशा प्रकारची पुरातनकालातील एक कथा शिवलिलामृतामध्ये अध्याय दुसरा यामध्ये आहे. एक व्याधी जंगलातील जनावरे मारुन, आपली उपजिवीका चालवीत असे. एके दिवशी तो व्याधी शिकारीसाठी बाहेर पडला, जाता-जाता त्याला एक रमणीय शिवमंदिर दिसले. त्याठिकाणी शिवाचा मंत्रघोष सुरु होता. सर्वजण ओम नमः शिवाय, हर हर महादेवाचा उच्चार करीत होते. त्या गर्जना त्याला ऐकू येत होत्या, त्यामुळे त्याच्याही मुखातून ओम नमः शिवाय, हर हर महादेव शब्द बाहेर पडू लागले. हळूहळू त्याचे पाप नाहीसे होऊ लागले. नामामुळे त्याचे हृदय पवित्र बनू लागले, तो व्याधी चाल होता. पण शिकार मिळत नव्हती, व्याधीला थोड्या अंतरावर एक सरोवर दृष्टीस पडले. सरोवराच्या काठावर मोठेमोठे वृक्ष होते, या सरोवरात पाणी पिण्यासाठी एखादे सावज येईल व आपणास सहज शिकार करता येईल असा विचार करुन व्याधी बिल्व वृक्षाच्या झाडावर चढून बसला व शिकारीची वाट पाहात बसला होता. समोर येणारी बिल्व पाने तोडून तो नकळत खाली टाकत होता, त्या झाडाखाली महादेवाची एक पिंड होती ते त्या व्याधीला काहीच माहिती नव्हते. त्याच्या हातून बिल्व पानांचा वर्षाव त्या पिंडीवर होत होता, व्याधीच्या मनात मंदिरातील हर हर महादेवचा घोष प्रगट होत होता. नकळत व्याधीच्या हातून पुण्याई वाढत होती. एक सुंदर गोजिरे हरीण व दोन पाडसे पाणी पिण्यासाठी तलावाजवळ आलेले दिसले त्याने बाण सोडण्याची तयारी केली. एवढ्यात ते हरीण मनुष्य वाणीने बोलू लागले, 'तू आम्हास मारु नको, मी घरी जाते, पाडसांना एकदा शेवटचे पाजते व परत येतेच व्याधीला या गोष्टीचे आश्चर्य वाटले त्यानंतर ती हरीण व तिचे पाडसे सकाळी व्याधीकडे येऊन हजर झाली आणि हरीण म्हणू लागली, 'पाडसांना मारु नकोस, मला मार, असे व्याधीला विनवू लागली तो अद्भूत प्रसंग पाहून व्याधीचे मन द्रवले तो म्हणाला, 'तुम्ही सगळी सुखाने घरी जा, यापुढे मी मृगहत्या करणार नाही, तुमच्या दर्शनाने माझे पातक नाहीसे झाले. मी परम पवित्र झालो, अशाप्रकारे त्याला उपवास, जागरण, शिवपूजा घडली आणि त्याचे व्रत पूर्ण झाले. त्यामुळे आजही तो व्याधी आणि ती हरीण (मृग) आकाशात तळपत असल्याचे दिसून येते. भगवंतावर पूर्ण श्रध्दा ठेवून आपला आत्मविश्वास जागृत ठेवून संकटाचा सामना करावा आणि संकटे दूर करण्याचा प्रयत्न करावा. संकटामुळे आपणास जीवनाचा खरा अर्थ समजत असतो. परमार्थ्याच्या मार्गाने वाटचाल करणाऱ्या अनेक लोकांना त्याचा अनुभव आला आहे. त्यामुळे ते परमार्थ्याची साधना करतात, माणसाच्या जीवनात सातत्याने संकटे येत असतात. सात्विक, राजस, तामस या गुणांनी विश्वासातील सारे कार्य होत असते. प्रत्येकाच्या हृदयात तीन गुण भरलेले असतात, माणूस कधी दुःखी असतो तर कधी सुखी असतो. समाजात आपण कार्य करत असल्यामुळे अनेक प्रकारच्या सुख-दुःखाशी सामना करावा लागतो, अशा वेळी माणूस ईश्वराची करुणा भावत असतो. संकटाचे निवारण करण्यासाठी शिवाची (शंकराची) उपासना करणे अत्यंत आवश्यक आहे. नकळत जरी (शिवाची) शंकराची भक्ती झाली तर कृपा प्राप्त होते.

- वसंतराव लवंगे, नरखेड, ता. मोहोळ.

टुडेज् ब्लॉग

आय एम कुब्रिकन...

हॉलीवूड दिग्दर्शक स्टॅनली कुब्रिकच्या 'स्पार्टाकस' (१९५६) सिनेमातला एक प्रसंग. उठाव करणाऱ्या गुलामांना रोमन सैन्यानं जेरबंद केलं आहे. हा उठाव स्पार्टाकसच्या नेतृत्त्वाखाली झाला. पकडलेल्या गुलाम सैनिकांमध्ये तो ही आहे. रोमन सैन्यातले अधिकारी त्याला शोधत आहेत. हे अधिकारी त्याला चेहऱ्यानं ओळखत नाहीत. ते विचारतात हु इज स्पार्टाकस? काही काळ शांतता... धमकावण्याच्या सुरात पुन्हा प्रश्न विचारला जातो, हु इज स्पार्टाकस? चिडीचुप... शांतता.... रोमन अधिकाऱ्यांच्या चेहऱ्यावरचा राग वाढत चाललाय, त्याचबरोबर त्याची अस्वस्थताही. मग गर्दीतला एक गुलाम उठतो आणि म्हणतो आय म स्पार्टाकस.. मग दुसरा उठतो, तोही म्हणतो आय म स्पार्टाकस'. मग तिसरा... चौथा... पाचवा... असं एक-एक करत सर्व गुलाम सैन्यच उभं राहतं. क्रुर रोमन साम्राज्याविरोधात गुलामांनी केलेला हा शेवटचा एल्गार असतो. रोम सैन्याचा सामना करताना यातला प्रत्येकजण 'स्पार्टाकस' झालाय. लेखक हॉवर्ड फास्टच्या कादंबरीतला 'स्पार्टाकस' भव्यदिव्य सिनेरामा प्रोजेक्शन माध्यमातून पडद्यावर आला.

अंधारात बसलेल्या प्रेक्षकांच्या मनाचा ठाव तोवर स्पार्टाकसनं घेतलेला असतो. तो या बिलंदर नायकाच्या प्रेमात पडलेला असतो. अगदी भारावून गेलेला असतो. मग गुलाम सैन्याप्रमाणेच थिएटरच्या अंधारातूनच एक एक आरोळी यायला लागायची. आय म स्पार्टाकस'... आय म स्पार्टाकस'... हाच 'कुब्रिक इफेक्ट' होता. पुढे त्याला 'कुब्रिकन' असं अनोखं नाव देण्यात आलं. अमेरिकन दिग्दर्शक स्टॅनली कुब्रिकचे सिनेमे पाहिल्यानंतर हे असंच होतं. आपल्या संपूर्ण कारकिर्दीत स्टॅनलीनं फक्त तेरा सिनेमे बनवले. हे तेराच्या तेरा सिनेमे ज्यांनी पाहिले, त्यांना कुब्रिकनची बाधा झाली. होय! बाधा हाच शब्द इथं योग्य आहे. कुब्रिकचे सिनेमे पाहताना फ्रेम अन फ्रेम, त्यातलं प्रत्येक दृश्य, डायलॉग, रिव्हर्स ट्रॅकिंग कॅमेरा आणि झिंग आणणारं संगीत याची बाधा होतेच होते. ते सिनेमे सतत तुमच्या मेंदूत सुरुच राहतात. जगभरात 'आय एम कुब्रिकन' असं म्हणणाऱ्या प्रेक्षकांचा एक पंथच तयार झाला आहे. १९९९ ला कुब्रिकचं निधन झालं. पण त्यानं मागे जो सिनेमांचा खजिना ठेवलाय तो कितीही लुटला तरी कमीच



होत नाही. दिवसेंदिवस हा खजिना शोधणाऱ्या प्रेक्षकांची संख्या वाढत जात आहे. त्याच्यातल्या फ्रेम्समधून रोज नव नवीन अर्थ शोधले जात आहेत.

स्टॅनली कुब्रिक उर्फ 'स्टॅन' उत्तम फोटोग्राफर होता. पण फोटोग्राफीच्या कुठल्याही वर्गात तो गेला नाही. जे शिकला ते अनुभवातून. जेव्हा तो सिनेमा दिग्दर्शनाकडे वळला तेव्हा ही अनुभवातूनच शिकत गेला. वयाच्या एकोणतीसाव्यावर्षी स्टॅनलीच्या नावावर चार सिनेमे होते. फ्रेन्च न्यू वेव्हची मुहुर्तमेढ रचणारे फ्रान्सिस्को ट्रफो आणि एलन रॅसन या दिग्दर्शकांची सुरुवात ही डॉक्यूमेंट्रीपासून झाली. त्यानंतर पाहणं, चर्चा करणं आणि सिनेमावर प्रचंड वाचणं अशा मार्गानं त्यांनी सिनेमाची कास धरली. स्टॅनलीही याच पंथातला आहे. त्याची जातकुळीही तशीच. प्रयोगशील आणि थेट. १९६० पर्यंत दोन डॉक्यूमेंट्री आणि चार सिनेमे केलेला कुब्रिक पार्थ ऑफ ग्लोरी'नंतर खऱ्या अर्थानं हॉलीवूडवर राज्य करू लागला. फियर एन्ड डिजायर (१९५३) आणि किलर्स किस (१९५५) या सुरुवातीच्या सिनेमांमधून कुब्रिकनं आपलं फोटोग्राफीक टॅलेन्ट दाखवलं. तांत्रिकदृष्या ही छाप पाडली. एका कॅरेक्टर्सचं एका सिनेमातून दुसऱ्या सिनेमात होणारा प्रवास ही कुब्रिकची स्टाईल ही तेव्हापासूनचीच. 'द किलींग' (१९५६) या सिनेमातून टाईम एन्ड स्पेसची सांगड घालण्याची हातोटी त्यानं दाखवून दिली. ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर सर मी कुब्रिकवर पुस्तक लिहतोय, असं सांगितल्यावर जास्तच एक्साईट झाले. त्यांनी पुस्तक वाचल्यावर त्यावर प्रस्तावना लिहिण्याचं मान्य केलं. अशोक राणे सरांमुळं मला सिनेमा बघण्याची नवीन दृष्टी मिळाली होती. मुंबई माफिया आणि त्यावरचे सिनेमा या माझ्या पीएचडीच्या विषयासंदर्भात त्यांचीशी भेट झाली होती. सिनेमा पाहणाऱ्या या माणसानं माझ्या एकूणच करीयरला कलाटणी दिलीय. त्यांनी पुस्तक वाचल्यानंतर त्यात काही बदल सुचवले. शिवाय पुस्तकाचं फॉरवर्ड लिहायला ते तयार झाले. या सर्व प्रक्रियेत २०२० उजाडलं होतं. गेली कित्येक वर्षे या कुब्रिकला उराशी बाळगुन मी फिरत होतो. संदीप चव्हाण या मित्रानं कुब्रिकचं हे पुस्तक छापण्यासाठी पाठपुरावा केला. २०१३ ते २०२० या कालावधीत मी जवळपास आठ नोकऱ्या बदलल्या. सायकलिकल बेरोजगारीच्या फेऱ्यात अडकलेला असताना कुब्रिकचा परफेक्शनिस्टपणा कामी येत होता. बेरोजगारीच्या या दिवसांमध्ये आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टीवल्ससाठी माझ्या आयुष्यात कुब्रिक आला आणि फिल्म फकीराच्या वाटचालीची सुरुवात झाली. ही वाटचाल अशीच पुढे सुरू राहणार आहे. यात शंका नाही. यासाठी कुब्रिकच कामी येईल याचं भान आहे.

- नरेंद्र बंडबे.

जन्म हा अखेरचा

ज्ञानाचारस्थल

अशा ज्ञानपीठातील या ज्ञानमंदिरात तुम्ही एक महिन्यापासून ''श्रीसिध्दांतशिखामणी'वर आशीर्वचने ऐकत आहात. लिंग-षटस्थलांतर्गत माहेश्वरस्थलातील 'ज्ञानाचारस्थल' या अंतिम स्थलाचा आज विचार करायला आहे.

ज्याप्रमाणे मनुष्याला क्रिया करावी लागते. भावना करावी लागते. त्याचप्रमाणे त्याला ज्ञानदेखील संपादन करावे लागते. याआधी धर्माचाराविषयी आणि भावाचाराविषयी आपण विचार केला आहे. आज ज्ञानाचारासंबंधी बोलायचे आहे. भावाचारसंपन्न अशा शिवयोग्याचा ज्ञानयुक्त आचारच इतरांसाठी ज्ञानाचार ठरतो.

शिवाद्वैतपरं ज्ञानं ज्ञानमित्युच्यते बुधैः । सिध्देन बाप्यसिध्देन फलं ज्ञानान्तरेण किम् । (श्री सिध्दांतशिखामणी, १६.७७)

प्रत्येक जीवात्म्याला काही ना काही ज्ञान असतेच. परंतु ज्या ज्ञानामुळे केवळ पोट भरता येते त्याला 'ज्ञान' म्हटले जात नाही. ज्या ज्ञानामुळे जीवात्मा संसारपाशापासून मुक्त होतो ते खरे ज्ञान होय. मनुष्याला सांसारिक ज्ञान भरपूर आहे, तरीदेखील त्याला कसे खावे, किती खावे, कसे बसावे हे शिकवावेच लागते. **(क्रमशः) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

चीनच्या वर्चस्वाला धक्के बसण्यास सुरुवात!

बालकांची खेळण्यांच्या ७३.२ अब्ज डॉलर्स एवढ्या जागतिक निर्यातीत एकट्या चीनचा वाटा ६६ टक्के होता. त्याच्या बरोबरीने व्हिएतनाम, नेदरलँड, झेक गणराज्य हे देश खेळण्यांची निर्यात करीत असतात. आता मात्र चीनची मक्तेदारी असलेल्या निर्यातीला भारताने जोरदार प्रत्युत्तर देण्यास सुरुवात केली आहे. २०२१-२२ या वर्षात भारताने २६०० कोटी रुपयांची तर गतवर्षीच्या एप्रिल - डिसेंबर या कालावधीत १००० कोटी रुपयांहून अधिक किंमतीची खेळणी निर्यात करीत २५.३१ टक्के वाढ ही जागतिक स्तरावरील सर्वात मोठी निर्यात साधण्याची किमया साधली आहे ती २०२१ च्या अर्थसंकल्पात आत्मनिर्भरतेच्या प्रोत्साहन कार्यक्रमांत सूक्ष्म, लघु आणि मध्यम (एसएमई) क्षेत्रांतर्गत खेळणी बनविणाऱ्या क्षेत्राला खेळणी उत्पादने आणि करांमध्ये सवलती दिल्या गेल्यामुळेच परंपरागत तसेच इलेक्ट्रॉनिक्स स्वरूपातील खेळणी बनविण्याच्या कलेत मोठी प्रगती गाठली आहे. माती आणि लाकडांपासून बनविली जाणारी खेळणी ही भारतातील कुटिरोद्योगातील हस्तकला, शिल्पकला अशा कलांनी अनेक राज्यांतील बालमने प्रभावित झाली आहेत. त्यांना मधल्या काळात चीनकडून स्वस्तातील परंतु निकृष्ट दर्जाची आकर्षक खेळणी पुरविली गेली. त्या सर्वांना भारतीयांनी पर्याय निर्माण करून चीनच्या मक्तेदारीला रोखण्यात यश मिळविले. गेल्या पाच वर्षांतील चीनची खेळण्यांची एकंदरीत निर्यात ८१ टक्क्यांवरून ६६ टक्क्यांपर्यंत घटली आहे. चिनी बनावटीच्या खेळण्यांच्या साचेबंद प्रकारांना पाहून हिरमुसकेल्या जगभरातील बालमनांना भारतीय कलावंतांनी बनविलेल्या खेळण्यांचे नाविन्य आकर्षित करून घेतील. यापुढे जगातील चिनी बनावटीच्या खेळण्यांना भारताच्या रूपाने किती मजबूत स्पर्धक उभा ठाकला आहे हे नजीकच्या काळात दिसून येईल. **- स्नेहा राज, गोरेगांव.**

महाशिवरात्री - एक महापर्व

चिदानंद रूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।।

..सर्वव्यापी स भगवान् तस्मात्सर्वगतःशिवः ।।'... भगवान शिव यांना पुराणांमध्ये 'रुद्र' या नावाने संबोधले आहे. कारण ते प्रत्याहार - प्रलयाचे आकर्षक आहेत. तसेच ते परमनर्तक, महान नटराज पण आहेत. म्हणूनच नृत्यशास्त्रात प्रथम नटराज स्वरूप शिवमूर्तीला वंदन करूनच नृत्य प्रारंभ केले जाते. भगवान शंकरांचे नृत्य हे शाश्वत आहे! कारण त्यांच्यात कल्याणाची मंगलरूपी अनुभूती पण शाश्वत आहे! हे सारे विश्व त्यांची नृत्य शाळा आहे! या विश्वात अनु-परमाणुपासून ते मोठ्यात मोठ्या शक्तीमध्ये जी स्पंदने दिसतात, ती त्यांच्या नृत्याचाच एक परिणाम आहेत! हे वर्णनोक्ती स्वयंम् भगवान शंकरांनीच स्वीकारली आहे!

नित्यमात्तकरणक्रमोन्मिषच्चित्रभावशत सन्निवेशिनीः।
निष्क्रियो निजमरीचिनर्तकीर्नर्तयामि परन्नुत्तदेशिकः।।

म्हणजे, मी सर्वात उत्तम नाट्याचा आचार्य होऊन माझ्याच करणे ईश्वरीरुपी नाटिकांना नाचवितो, या इंद्रियरूपातून निर्माण होणाऱ्या नाटिका अद्भूत आणि विविध प्रकारचे भाव दर्शविणाऱ्या आहेत. या नृत्याने भगवान शंकर ब्रह्मांडात गती देतात आणि जीव निर्जीव अशी सृष्टी निर्माण करतात! त्यांच्या नृत्याची गती, उपरती, निवृत्ती, समाधी, प्रलयाकडे नेणारी अर्थात अंतरतम-ऊर्ध्वतमाशाकडे ठरते! त्यांचे नृत्य भयंकर आहे! पण, शिवतत्त्वापासून शून्य नाही! ते ब्रम्हांडाचा कधीच विनाश इच्छित नाहीत! ते तर श्रेष्ठ पालक आणि मंगल कल्याणकारी आहेत! त्यांना संहार कदापि प्रिय नाही! परंतु, जेंव्हा पाप ब्रह्मांडात वाढीला लागते, तेंव्हा त्यांचे नृत्य विवश होऊन प्रलयंकारी

रूप धारण करते! परंतु, भगवान शिवाची ही क्रिया सुध्दा जगत कल्याणासाठीच धारण केलेली असते!

पुष्पदंत लिहितात की, 'नर्तनाचे वेळी श्री शंकरांच्या पादाघाताने पृथ्वी डोलते, आकाशात विविध आवाज होऊ लागतात, परंतु यावेळी ही शिवांच्या मनात संहाराची नाही तर निर्माणाचीच भावना असते. भगवान शिवांचे हे नटराज-नृत्य त्यांच्या महिमामय स्वरूप आणि आमीत ऐश्वर्याची साक्ष देत 'सत्यम्-शिवम्-सुंदरम्' चा अमर संदेश देणारे ठरते! नटराजांच्या या रूपात भगवान शिवाची कल्पना भारतीय संस्कृती आणि धर्म अशी समन्वयात्मक विशेषतः आहे. याचे दुसरे उदाहरण कोठेच पहायला मिळत नाही.

महाभारतात भगवान शिवाचे स्वरूप आणि त्यांची उपासना यासंबंधी रामायणापेक्षा अधिक माहिती मिळते. तिथे भगवान शंकराचे एक दार्शनिक आणि दुसरे लोक प्रचलित असे उभयविध रूप दृष्टोत्पत्तीस येते. दार्शनिक रूपात शिव हे परब्रह्म आहेत, असीम आहेत. विश्वकर्ता आणि विश्वसंहर्ता आहेत.

शिव स्वतः संख्या आहेत! ते सांख्यदर्शन स्वतः स्वतः च्या ठिकाणी जाणतात ! जे लोक संख्या सिध्दांतांचे विशेष ज्ञानी आहेत, ते शिवाची प्राप्ती करून घेऊन मोक्ष मिळवतात, असे महाभारतात म्हटले आहे! भगवान शिव यांचा योगदर्शनाशी जो संबंध आहे, तोही त्यांच्या दार्शनिक रूपाचा एक अंग आहे! शिव हे योग्यांचे परमस्वरूप आहेत. तो स्वतः महायोगी आहे असे महाभारतात स्पष्ट म्हटले आहे. महाभारतातले शिवाचे लौकीक रूप याहून निराळे आहे. अनेक रानटी, पहाडी, जाती जमातींनी आपल्या कल्पनेप्रमाणे घडवलेले शिवाचे रूप, तिथे 'कापालिक' या नावाने दाखवले आहे. सामान्य असंस्कृत जणांना त्याचे हेच रूप प्रिय व पूज्य होते!

या रूपात शिवाचा शाकिनी, डाकिनी, भूत, प्रेत, पिशाच्च वेताळ इत्यादी भूतांयोनींशी संबंध होता. महाभारतातल्या या लोकप्रिय शिवाचे वर्णन कवी पुष्पदंताने संक्षेपात केले आहे, ते असे....

श्मशानेष्वाक्रीडा स्मरहर पिशाचाः सहचराः
चिताभस्मालेपःस्रगपि नृकरोटीपरिकरः।
अमंग्ल्यं शीलं तव भवतु नामैवमखिलं
तथापि स्मर्तृणां वरद परम मंगलम्।।

हे मदन बहना शंकरा तुझा निवास स्मशानात आहे. तुझ्याभोवती भूत-पिशाच्च यांचा गराडा आहे. तुझ्या हाती नरकपाल आहे. गळ्यात नररूंडांच्या माळा आहेत. अंगाला चिता भस्माचा लेप आहे. असा तू सर्वार्थी अमंगळ पण, भक्तांचे मात्र तू सदैव मंगल करतोस. शिवाचे हे कापालिक रूप आहे. याच्या इतकेच जनमानसातले त्याचे प्रिय रूप म्हणजे किरातरूप. या रुपात तो गजचर्म पांघरतो. त्याला मद्य प्रिय आहे. तो विविध क्रीडा-विलासात रहात असतो. त्याच्याभोवती हजारो स्त्रियांचा आणि शिवगणांचा गराडा असतो. त्याच्यापुढे भूत गण हसत, नाचत असतात. भगवती उमाही आहे. त्याच्याबरोबर त्याच वेशात ती असते हे विशेष. शिवाच्या याच विलासप्रिय रूपाविषयी एक कथा ब्रह्मांडपुराण दिली आहे. ती अशी,

सदाशिव ऋषींच्या आश्रमभूमीत गेला, तो पूर्णपणे नग्न होता, त्याचे केस विखुरलेले होते, वनात प्रवेश करताच तो उन्मत्तपणे गाऊ-नाचू लागला. ते पाहून आश्रमातल्या ऋषीस्त्रिया त्याच्यावर मुग्ध झाल्या, त्या शिवाकडे जाऊन त्याच्या त्या उन्मत्त नृत्यात सहभागी झालेल्या, आश्रमातल्या ऋषींना आपल्या बायकांचे हे चाळे आवडले नाही, पण तरीही ते त्यांना आवरू शकले नाहीत, मग ते शिवालाच शिव्या शाप देत आपले गाऱ्हाणे घेऊन ब्रह्मदेवाकडे गेले, ब्रह्मदेव त्यांना म्हणाले, 'तो कामोन्मत्त पुरुष सामान्य नाही, तो साक्षात महादेव आहे, तुम्ही त्याची निंदा करू नका आणि त्याला शिव्याही देऊ नका, मग ऋषींना आपली चूक कळून आली आणि त्यांनी शिवाची स्तुती केली.

एकेकाळी काश्मिरात शिवाचे हे विलासीनृत्य प्रिय रूप उपासनेचा विषय होते. नीलमतपुराणात सांगितले आहे की, 'कृष्ण चतुर्दशीच्या रात्री काश्मिरी शैव शिवाची विशेष पूजा करतात. त्या दिवशी गाऊन नाचून रात्र जागवतात. त्याप्रसंगी गणिकांसह रतिविलास करतात.' असा भगवान शिव सर्व स्वरूपात आढळतात..।।

- विठ्ठल जोशी-वैरागकर, बार्शी.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५

निवडणूक आयोगाचा निकाल : शिंदे गटात खुषी, ठाकरे गटात गम

महाशिवरात्र आणि शिव जयंतीच्या शुभ मुहूर्तावर हा निकाल लागला आहे. हा सत्याच्या बाजूने निकाल आहे. स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांना जे अपेक्षित होते ते आज सत्यात उतरले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बाळासाहेबांचे विचार पुढे नेले. त्यांनी राजकारणाबरोबर समाजकारणही केले. शिवसेनेसाठी आज मोठा आनंदाचा दिवस असल्याचे जिल्हा समन्वयक प्रा.शिवाजी सावंत यांनी सांगितले.

- प्रा.शिवाजी सावंत (जिल्हा समन्वयक शिवसेना)

केंद्रीय निवडणूक यंत्रणा कोणत्या पक्षाला न्याय देण्यासाठी नाही, मात्र भाजप या यंत्रनेचा वापर करत आहे. एकनाथ शिंदे यांना धनुष्यबाण आणि शिवसेना नाव मिळला असलतरी उध्दव बाळासाहेब ठाकरेच्या सेनेवर कोणताचअघात होणार नाही मुंबईत झालेल्या पहिल्या पोट निवडणूकीत मशाल चिन्हावर शिवसेने विजय मिळाला आहे. ज्या बाळासाहेबांनी या चाळीस आमदारांना शिवसेनेच्या चिन्हावर निवडणू आणल मात्र गद्दारी केली याला जनता विसरणार नाही निवडणूकीमध्ये यांचा धडा गद्दाराला शिकवणार.

- पुरूषत्तोम बरडे (जिल्हाप्रमुख ठाकरे गट)

ज्या धनुष्य बाणावर स्व.बाळासाहेबांनी नितांत प्रेम केले ते नाव आणि चिन्ह एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला मिळाले त्यांचा शिवसैनिका आनंद आहे. राज्याच्या मुख्यमंत्रीपदी एकनाथ शिंदे विराजमान झाल्या नंतर जो आनंद सामान्य शिवसैनिकांना झाला होता. त्याच्या पेक्षा जादा आनंद चिन्ह आणि नाव मिळाल्यानंतर झाला आहे.

- अमोल शिंदे (जिल्हाप्रमुख शिवसेना)

केंद्रशासनाचा दबाव निवडणूक आयोगावर होता. त्यामुळे उध्दव ठाकरे यांची खरी शिवसेना असताना दबावाला बळी पडून हे चिन्ह आणि नाव मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला दिले आहे. एकंदिरीत राज्यामध्ये भाजपाची हुमशाही चालू आहे. मात्र ज्या बाळासाहेबांनी शिवसेना वाढवली चिन्ह घरात घरात पोहचवली त्यांनी गद्दारी केली.

- अमर पाटील (जिल्हाप्रमुख ठाकरे गट)

निवडणूक आयोगाच्या निर्णयामुळे खार न्याय शिवसैनिकांना झाला आहे. सामान्य जनेतेचे काम करण्यासाठी निवडणुक आयोगाने चांगला निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना राज्याचे विकासाचे निर्णय घेण्यासाठी पाठबळ मिळणार आहे. शेवटी सत्यांचा विजय झाला

- मनोज शेजवाल (शहराध्यक्ष शिवसेना)

शिवसेना कार्यकर्त्यांची होती आणि कार्यकर्त्यांची करणार आहे. त्यामुळे हा निकाल साठी अपेक्षितच होता. सध्याच्या राजकारणात घराणेशाही चालत नाही हे आज सिद्ध झाले आहे आजच्या निकालाने शिवसैनिकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे, असे जिल्हाप्रमुख मनीष काळजे यांनी सांगितले.

- मनीष काळजे (जिल्हाप्रमुख शिवसेना)

शिवसैनिकांनो, खचून जाऊ नका, निकाल जेवढे उद्धवजी ठाकरे साहेबांच्या विरोधात लागणार. तेवढेच शिवसैनिक आणि जनता पेटून उठणार. चला, आता खरी लढाई सुरू झाली आहे. पेटून उठा आणि उध्दव साहेबांचे हात बळकट करा.

- अनिल स.कोकीळ (संपर्क प्रमुख ठाकरे गट)

शिवसेना

सोलापुरातील खरी शिवसेना आमचीच : अमोल शिंदे

पेढे वाटून गुलालाची उधळण; जय भवानी, जय शिवाजीचा दिला नारा

✔ सुराज्य/सोलापूर

शिवसेना नेमकी कुणाची याचा फैसला निवडणूक आयोगाने दिला आहे निवडणूक आयोगाने शिवसेना ही एकनाथ शिंदे गटाची खरी शिवसेने असल्याचे म्हणत त्यांना धनुष्यबाण चिन्ह दिल्याने सोलापुरातील शिवसैनिकांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात जल्लोष करत आनंद उत्सव साजरा केला. पेढे वाटत गुलालाची मुक्त उधळण करत जय भवानी जय शिवाजीचा नारा दिला सोलापुरातील खरी शिवसेना आमची असल्याचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले उध्दव बाळासाहेब ठाकरे यांची सेना म्हणजे काँग्रेस राष्ट्रवादी आणि शरद पवारांची संघटना म्हणून असल्याची टीका

देखील शिंदे यांनी केली

एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर उध्दव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांच्यामध्ये शिवसेना आणि धनुष्यबाण चिन्हावरून वाद रंगला होता. सदर वाद न्यायालयात आणि निवडणूक आयोगाकडे गेला होता. न्यायालयात कोणताही निर्णय झालेला नसताना राज्य निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाणाबाबत निर्णय देत एकनाथ शिंदे गटाला शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे चिन्ह दिल्याने राज्यांमध्ये एकनाथ शिंदे गटाने आनंद उत्सव साजरा केला. त्याचाच एक भाग म्हणून सोलापूर आतील एकनाथ शिंदे गटाचे समर्थक जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात ढोल ताशाच्या गजरात पेढे वाटत आनंद उत्सव साजरा केला.

छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले. यावेळी डोक्यावर भगवा टोपी, जय भवानी जय शिवाजी जयघोष करत हा आनंदोत्सव साजरा केला यावेळी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे म्हणाले सोलापुरातील खरी शिवसेना ही आमची शिवसेना आहे उध्दव ठाकरे यांची शिवसेना म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस आणि शरद पवारांची संघटना असल्याचा टीका शिंदे यांनी केली यावेळी शहराध्यक्ष मनोज शेजवाल, तुकाराम मस्के सागर पिसे, सुजित खुर्द यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी महिला उपस्थित होते.

महाशिवरात्रीनिमित्त अमरनाथ देखावा

✔ सोलापूर : महाशिवरात्रीच्या निमित्त सिंधी समाज व तहेलीराम आनंदाने युथ फाऊंडेशन सोलापूर यांच्या वतीने शिवरात्रीच्या पवित्र दिवशी शिवभक्तांच्या जीवनाची एक नवीन आणि चांगली सुरुवात व्हावी या उद्देशाने मीरा सोसायटी येथे अमरनाथ देखावा तयार करण्यात आला आहे अशी माहिती आयोजक आनंदानी पत्रकार परिषदेत दिली हा देखावा दिनांक १८ फेब्रुवारी ते २० फेब्रुवारी २०२३ पर्यंत सकाळी सात ते रात्री नऊ वाजेपर्यंत दर्शनासाठी खुला राहणार आहे अमरनाथ देखावा प्रसिध्द मूर्तिकार प्रकाश माने यांच्या काला व कल्पनेच्या गुनातून तयार करण्यात आला आहे.

करमाळ्यात शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारणार

जिल्हाधिकाऱ्यांनी दिली मान्यात

✔ सुराज्य/सोलापूर

करमाळा येथिल भावानी चौकातील छत्रपाती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यास जिल्हाधिकारी यांच्या समिती मान्यात दिली आहे. त्यामुळे गेली दोन वर्ष रखडलेला विषय मार्गी नियाल्याने करमाळ शिवजन्मोस्व समितीने आनंद व्यक्त केला आहे.

करमाळातील भवानी चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अर्ध पुतळा आहे. त्या ठिकाणी महाराजाचा अश्वारूढ पुतळा उभा करण्याची मागणी शिवजन्मोस्व समितीच्या वतीने केली होती. मात्र कागदपत्राच्या अभावी गेली दोन वर्षा झाले हा प्रस्ताव लटकला होता. समितीच्या वतीने पाठपुराव करत कागदपत्रातील त्रुटी पुर्ण करून परिपुर्ण प्रस्ताव सादर केला शुक्रवारी जिल्हाधिकारी मिलिंद शंभर यांच्या अध्यक्षते खाली पुतळा समितीची बैठक झाली या बैठकीत कागदपत्राची तपासणी करून जिल्हाधिकाऱ्यांनी या प्रस्तावास मान्यता दिली त्यामुळे करमाळा वेथिल भचानी चौकात छत्रपती शिवाजी महाराजाचा पुतळा उभअरण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

जिल्हातील पुतळा उभारणीचे अनेक प्रस्ताव प्रलंबित आहे. पुतळा उभारणी साठी २० विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते त्या शिवाय कला संचालय पथाकडून पुतळ्याची पाहणी केली जाते त्यानंतर तो पुतळा उभा करण्यास मान्यात दिली जाते तर शाकिय जागेत पुतळा उभा करायचा असेलतर शासनाची मान्यात घ्यावी लागते त्यामुळे जिल्हातील पुतळा उभअरणीचे अनेक प्रस्ताव रखडले असल्याची माहिती जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दिली.

घरकुलाची अर्धवट कामे फेब्रुवारीपर्यंत पूर्ण करा : कोहिनकर

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर जिल्ह्यातील एकूण घरकुलापैकी जवळपास ११५०० घरकुले अजूनही अर्धवट अवस्थेत आहेत ही सर्व घरकुले. फेब्रुवारी अखेर पर्यंत पूर्ण करा अन्यथा संबंधित लाभार्थी आणि अधिकारी यांच्यावर कारवाई करण्यात येईल असा इशारा जि प चे मुख्य कार्यकारी अधिकारी कोहिन कर यांनी दिला आहे.

जिल्ह्यात घरकुलाची मोठी संख्या असून जवळपास ४२. हजार घरकुलांची मंजुरी आली होती त्यापैकी ३१ हजार घरकुल बांधण्यासाठी. वितरित. करण्यात आली होती त्यापैकी अकरा हजार पाचशे घरकुले अजूनही अपूर्ण अवस्थेत आहेत ती तातडीने पूर्ण करावी तसेच उर्वरित घरकुल यादी लवकरच बांधणीसाठी लाभार्थ्यांना वितरित करण्यात येणार आहेत तसेच ज्या लाभार्थ्यांकडे शौचालय नाहीत अशाही लाभार्थ्यांनी शौचालय बांधून घ्यावेत जिल्ह्यातील सध्याचे घरकुल बांधणी याप्रमाणे अक्कलकोट १११२ सोळाशे बार्शी१६ ७७ करमाळा ११ ५९ माढा १११३ माळशिरस १६९७ मंगळवेढा १०२७ मोहोळ ८६५ पंढरपूर ७८५ सांगोला १७०१ उत्तर सोलापूर २४८ दक्षिण सोलापूर१०६२ अशाप्रकारे जिल्ह्यातील लाभार्थ्याकडून पूर्ण करण्यात आलेली घरकुले तर उर्वरित अकरा हजार पाचशे अर्धवट असलेली घरकुले आहेत ती तातडीने पूर्ण करावेत अन्यथा लाभार्थ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही कोहिन कर म्हणाले.

पंढरपूर नगरपरिषदेच्यावतीने शहरात येणाऱ्या भाविकांसाठी मोफत पार्किंग सुविधा

बोगस पावत्या फाडणाऱ्या व्यक्तीवर फौजदारी गुन्हा दाखल करणार : मुख्याधिकारी माळी

✔ सुराज्य/पंढरपूर

पंढरपूर ही महाराष्ट्राची आध्यात्मिक राजधानी असून वर्षातून आषाढी कार्तिकी माघी चैत्री यासारख्या चार मोठ्या यात्रा व दरमहा येणाऱ्या एकादशी दिवशी तसेच चातुर्मासामध्ये संपूर्ण देशामधून व महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यामधून श्री विठ्ठल रुक्मिणीच्या दर्शनासाठी लाखो भाविक पंढरपूरमध्ये येत असतात.

या येणाऱ्या भाविकांना चांगल्या प्रकारची सेवा सुविधा मिळावी म्हणून नगरपरिषद वेळोवेळी प्रयत्न करत असते भाविक शहरांमध्ये दाखल झाल्यानंतर त्यांना पार्किंगची व्यवस्था व्हावी म्हणून शहरातील दहा ते अकरा ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. यापूर्वी नगर परिषदेच्या वतीने आरोग्य व्यवस्था व पार्किंगसाठी कर आकारणी करण्यात येत होती. परंतु येणाऱ्या भाविकांचे विचार करता नगर परिषदेने काही कालावधी करता आरोग्यव्यवस्था व पार्किंगची सुविधा मोफत पुरविण्याचा निर्णय माघी यात्रेपासून घेतला होता. असे असतानाही यात्रा कालावधीमध्ये व इतर वेळेस शहरातील काही व्यक्ती या मोफत असलेल्या पार्किंगच्या ठिकाणी बोगस पावती देऊन पार्किंग कराची रक्कम भाविकांकडून वसूल करत असल्याचे वेळोवेळी निदर्शनास आले आहे. याबाबत शहर पोलीस स्टेशन यांच्याकडे नगर परिषदेच्या स्तरावरून तक्रारी नोंदविण्यात आलेल्या आहेत असे असून सुध्दा अजूनही काही व्यक्ती पार्किंगच्या बोगस पावत्या देत असल्याचे निदर्शनास येत आहेत. तरी नगर परिषदेच्या वतीने सर्व भाविकांना जाहीर आवाहन करण्यात येत आहे की कोणत्याही बोगस पावती फाडणाऱ्या व्यक्तीस आरोग्य व्यवस्था पार्किंगची पावती चे पैसे देऊ नये असे बोगस पावती देत असल्याचे निदर्शनास आल्यास त्वरित नगर परिषदेकडे व पोलीस प्रशासनाकडे तक्रार दाखल करावी व अशा बोगस पावती देणाऱ्या व्यक्तींचा फोटो काढून ठेवावा. जेणेकरून नगरपरिषद आपण दिलेल्या तक्रारीच्या व माहितीच्या आधारे सदर व्यक्तींवर फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करेल असे आवाहन नगर परिषदेचे मुख्याधिकारी अरविंद माळी यांनी केले आहे.

जिल्हा परिषद मराठा सेवा संघातर्फे शिवजयंतीनिमित्त कार्यक्रम

✔ सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद सोलापूर मराठा सेवासंघ शाखेतर्फ छत्रपत्री शिवाजी महाराज जयंती निमीत्त १९ फेबुवारी रोजी विविध कार्यक्रम राबविले जाणार आहे. जयंती निमित्त येणात येणाऱ्या कार्यक्रमाचे नियोजन करणेसाठी झालेल्या बैठकींत हा निर्णय घेण्यांत आला असल्याची माहिती मराठा सेवा संयाच्या जिल्हा परिषद शाखेचे अध्यक्ष अविनाश गोडसे यांनी दिली.

सकाळी १० वाजता यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये राज्यगीताचे गायन करून छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येईल. मराठा सेवा संघ शाखा जिल्हा परिषद सोलापूर यांचेतर्फ जिल्हा परिषदेच्या यशवंतराव सभागृहामध्ये मनिषा आव्हाळे सहा. जिल्हाधिकारी यांचे शुभहस्ते, संदीप कोहीणकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली मुख्य लेखा व वित्त अधिकारी अजयसिंह पवार, गट विकास अधिकारी मनोज राऊत, वैदयकिय अधिकारी डॉ. सागर मंगेडकर, शाखा अभियंता राजेश जगताप, ग्रामविकास अधिकारी पांडुरंग कागदे, ग्रामसेवक नागनाथ जोडमोटे, प्राथमिक शिक्षक अर्जुन आवताडे, वरिष्ठ सहाय्यक प्रदीप सकट, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) विलास मसलकर, परिचर विरभद्र हिरजे यांना सन्मानीत करण्यात येणार आहे.

स्वानंद प्रस्तुत स्मृती गीते, पोवाडा व शिवगीतांचा कार्यक्रम (गर्जा महाराष्ट्र माझा) सोलापूर जिल्हा परिषद शिक्षकांचा वादयवृंद हा कार्यक्रम आयोजीत केला आहे. सदर प्रसंगी सचिन चव्हाण,राम जगदाळे, अनिल जगताप, सचिन जाधव, सचिन साळूंखे, प्रकाश शेंडगे,सुभाष कदम, आप्पासाहेब भोसले, विष्ठल मलपे,संतोष शिंदे, संजय पाटील, अजित देशमुख, महेश पाटील, विशाल घोगरे, चेतन भोसले, प्रदिप सुपेकर, विकास भांगे, वासुदेव घाडगे, अविनाश भोसले, गणेश साळूंखे, सचिन पवार, उमेश खंडागळे, जयंत पाटील, महेंद्र माने, अभिजीत निचळ, ऋषिकेश जाधव, रवि पाटील, विनायक कदम, सुनिता भुसारे, आश्विनी सातपुते, अनुपमा पडवळे, भारती धुमाळ, सविता मिसाळ उपस्थित होते.

प्रशांत चोळ्ळे यांचे निधन

✔ सोलापूर : प्रशांत मल्लिकार्जुन चोळळे (वय ४२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांचे घर- ढंगे रेसिडेन्सी, शेळगी- सोलापूर, येथून नियून, अंत्यविधी रूद्रभूमी, रुपाभवानी रोड, सोलापूर येथे करण्यात आला. त्यांच्या पश्चात आई, पत्नी दोन मुले, तीन भाऊ, नातवंडे अस परिवार होत.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

SRM TENDER NOTICE

Sr. No.	Tender No.	Tender Details	Tender / Enquiry RFx No.	Amount	EMD	Tender Fee	Tender Publication Date
1	EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-25/ 2022-23	SRM Tender for Work of Rate Contract for attending routine Maintenance work during Outage & Emergency work during Breakdown/occurrence on various 220/132/110KV Lines under jurisdiction of Trans O&M Division, Solapur.	**RFx No. 7000026189**	Rs. 25,00,000/- Including Taxes	Rs. 25,000/-	Rs. 525/- Including GST	From 14.02.2023 @ 9:00 Hrs to 22.02.2023 @ 18:00 Hrs
2	EE/EHV/ O&M/SUR/ SRM/T-23/ 2022-23	SRM Re-Tender for Supply of various size ropes required at various Substations & Line Subdivision offices under jurisdiction of Trans O & M Division, Solapur.	**RFx No. 7000025716 (IInd Call)**	Rs. 4,98,812/- Including Taxes	Rs. 5,000/-	Rs. 525/- Including GST	From 14.02.2023 @ 9:00 Hrs To 22.02.2023 @ 18:00 Hrs

For more details, please visit SRM website **www.mahatransco.in** or **https://srmetender.mahatransco.in**
Contact Details : Add'l Executive Engineer - 7447441096, Dy. Executive Engineer - 7447441043

Sd/-
Executive Engineer
EHV O&M Division, Solapur

सांगोले नगरपरिषद, सांगोले
जि.सोलापूर

जा.क्र./सांनप/८/६४३ दि.१७/०२/२०२३

ई-निविदा प्रसिद्धी सूचना

सांगोले नगरपरिषद, जि.सोलापूर मार्फत वैशिष्ट्यपूर्ण योजना सन २०२१-२२ अंतर्गत १) परिट समाजासाठी नगरपालिका जागेमध्ये बहुउद्देशीय सभागृह बांधणे. २) चिंचोली रोड पाण्याच्या टाकीस कुंपणभिंत व चौकीदार निवासस्थान बांधणे. ३) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर सभागृहाचे (टाऊन हॉल) नुतनीकरण करणे इत्यादी कामाची ई-निविदा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत ठेकेदार यांच्याकडून मागविणेत येत आहेत. कामाचा सविस्तर तपशील http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२०/२/२०२३ ते २७/२/२०२३ रोजीपर्यंत उपलब्ध आहे.

सही/-
(सुधीर गवळी)
मुख्याधिकारी, नगरपरिषद सांगोले

अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

जाहीर ई-निविदा क्र.१५ प्रसिद्धीकरण २०२२-२३
(अग्निशमन सेवा बळकटीकरण योजना)

जा.क्र.२०२३/न.प.अ.कोट/शिक्षण/संकलन-१/आरआर-/कावि-७४
दि.१७/०२/२०२३

मुख्याधिकारी नगरपरिषद अक्कलकोट हे शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत खरेदी करणेकरिता ऑनलाईन ई-निविदा मागविणेत येत आहेत. अटी शर्तीसह सविस्तर निविदा सूचना, निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर दि.२०/०२/२०२३ ते दि.२७/०२/२०२३ रोजी दुपारी ४.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहेत. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि.२७/०२/२०२३ रोजी ठिक ४ वाजेपर्यंत स्विकारण्यात येती. निविदापूर्व बैठक दि.२२/०२/२०२३ रोजी दु.३.०० वा. नगरपरिषद कार्यालय अक्कलकोट येथे आयोजित करणेत आलेली आहे. निविदा शक्य झाल्यास दि.२८/०२/२०२३ रोजी सायं.४.०० वा. उपस्थित मक्तेदार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांचे समक्ष उघडण्यात येतील.

सही/-
(सचिन पाटील)
मुख्याधिकारी तथा प्रशासक
नगरपरिषद अक्कलकोट

जाहीर समन्स

मा.उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप.असोसिएशन लि., सोलापूर
११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर - ०१

मनोरमा अर्बन को.ऑप बँक लि.सोलापूर शाखा सात रस्ता अवंती नगर, ... **अर्जदार**
विरुद्ध
(खालील तपशिलानुसार नमुद केलेले थकबाकीदार सभासद) ... **जाब देणार**

अ. नं.	केस नंबर	दावा रक्कम	जाब देणार नं.	जाब देणाऱ्याचे नाव व पत्ता
१	७९०/ २०२२-२३	२९,६३१/-	२ ३	**श्री संतोष धनाजी भोळे** घर नं.२१८३, मड्डीवस्ती, भवानी पेठ, सोलापूर **मारूती प्रभाकर कुरवारकर** घर नं.२१८३, मड्डीवस्ती, भवानी पेठ, सोलापूर
२	८४३/ २०२२-२३	२७,९१५/-	१ २ ३	**श्री सुनंदा संतोष हावरे** रा.घर १३, भिमाई नगर, विजापूर रोड, सोलापूर **अंबुबाई कृष्णांत पांढरे** रा.घर १३, भिमाई नगर, विजापूर रोड, सोलापूर **रत्नामाला सुनिल कांबळे** रा.घर १३, भिमाई नगर, विजापूर रोड, सोलापूर
३	८४४/ २०२२-२३	३७,३४३/-	१ ३	**सोनाली युवराज राठोड** रा.घर नं.७५ सुशील नगर विजापूर रोड, सोलापूर **मीना ज्ञानेश्वर काकडे** रा.घर नं.३०५ कमला नगर डी. एड कॉलेज जवळ विजापूर रोड, सोलापूर
४	८४५/ २०२२-२३	४१,४६०/-	१ २ ३	**मनिषा संजय भुजबळ** रा.मु.पो.केगांव, ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर **संगीता संजय साखरे** रा.मु.पो.केगांव, ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर **वंदना राजाराम निपचरे** रा.मु.पो.केगांव, ता.उ.सोलापूर, जि.सोलापूर

या कामी अर्जदार बँक यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमुद केलेल्या जाब देणार यांनी दिलेला पत्ता उपलब्ध होत नसल्याने सदर जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ठ अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वत: जातीने वार शुक्रवार दि.०३/०३/२०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व निर्णय देण्यात येईल. त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपुर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि.१७/०२/२०२३ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले आहे.

सही/-
उपनिबंधक
सहकारी संस्था (परसेवा)
सोलापूर जिल्हा नागरी सहकारी
बँक्स् को.ऑप.असोसिएशन लि. सोलापूर

शिक्का

CMYK

उर्दू भाषा मने जोडणारी व प्रभावित करणारी भाषा : कारंजे

सोलापूर : उर्दू भाषा अत्यंत प्रभावित करणारी व मने जोडणारी भाषा असुन ती विविध समाजाला जोडुन मानवतेचा संदेश देते असे गौरवपुर्ण उध्दगार पालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी काढले. ते अखिल भारतीय उर्दू साहित्य संमेलन समितीतर्फे आयोजित पुरस्कार वितरण समारंभात कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरुन बोलत होते. व्यासपिठावर प्राथमिक शिक्षण मंडळाचे प्रशासन अधिकारी हणमंतु जाधव, डॉ.अमजद सय्यद उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीस संस्थेचे विश्वस्त प्रा.रियाज वळसंगकर यांनी सर्वांचे स्वागत करुन पुरस्कार देण्यामागचा हेतु विशद केला. यावेळी मातृभाषा वेगळी असताना हि उर्दू भाषा अवगत करुन त्यावर प्रेम करणाऱ्या हेमंत कुलकर्णी यांना उर्दू मित्र पुरस्काराने तर उर्दू भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करुन उर्दू साहित्य व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनिय योगदान दिल्याबद्दल सय्यद बशीरअहमद बशीर व जुनेद अ.कय्युम शेख यांचो जीवन गौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, रोख पाच हजार, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरुप होते. कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष ऍड.यु.एन.बेरिया विकार शेख, शफी कॅप्टन, अय्युब नल्लामंदु, प्रा.हारुण बंदुकवाला, रफिक खान, नासीर आळंदकर, जावेद उस्ताद, याकुब मंगलगिरी, संस्थेचे पदाधिकारी व साहित्य प्रेमी मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचलन प्रा.रियाज वळसंगकर यांनी केले तर हुसेन बक्षी यांनी आभार मानले.

ब्रम्हाकुमारीज यांचे कार्य कौतुकास्पद : डॉ.इनामदार

अकलूज : आजच्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक आजारांबरोबरच मानसिक आरोग्यांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांची संख्या वाढत चालली आहे.अशा परिस्थितीत ब्रम्हाकुमारीज संस्थेच्या वतीने माणसाचे मनोबल व आत्मविश्वास तथा मानसिक आरोग्य वाढविण्याचे होत असलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार प्रसिध्द हृदयरोगतज्ज्ञ डॉ.एम.के. इनामदार यांनी केले. अकलूज येथील ब्रम्हाकुमारीज ईश्वरीय विश्वविद्यालय शाखेच्या वतीने आयोजित महाशिवरात्री पावन पर्वच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी पोलीस अधिकारी गणेश चौधरी,सुनिल फडे,विजय शिंदे,बी.के.डॉ.पावले भाई, संस्थेच्या संचालिका बी.के.शिवरात्री,बी.के.गोदावरी,बी.के.अनु,बी.के.प्रिती बहेनजी व ब्रम्हाकुमारीज परिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शिवध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.यावेळी विशेषता द्वारा विश्व कल्याणकारी बनने का संकल्प या विषयावर बी.के शिवरात्री बहेनजींनी मार्गदर्शन केले. तर बी.के.अनु बहेनजींनी महाशिवरात्रीचे अध्यात्मिक रहस्य स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बी.के.गोदावरी बहेनजी यांनी मानले.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन काळात सेट परीक्षेची तयारी करावी : प्रा. शिंदे

सांगोला : सांगोला येथील विज्ञान महाविद्यालया अंतर्गत स्पर्धा परीक्षा समितीमार्फत पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन काळात सेट परीक्षेची तयारी कशी करावी ? या विषयावर इंग्रजी विषयाचे सहा.प्राध्या.शिंदे डी.आर.यांनी गुरुवारी १६ फेब्रूवारी रोजी मार्गदर्शन केले. पदव्युत्तर विभागातील जे विद्यार्थी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून करिअर करु इच्छितात,अशा विद्यार्थ्यांना सेट परीक्षेबद्दल माहिती व्हावी,ह्या हेतूने सदर कार्यकर्माचे आयोजन करण्यात आले होते.सदर मार्गदर्शन वर्गामध्ये प्रा.शिंदे डी.आर.यांनी महाविद्यालयामध्ये शिकत असतानाच सेट पेपर भाग एक या विषयाची तयारी करताना ऍप्टीट्यूड टेस्ट,लॉजिकल रीजनिंग,नंबर सेरीज,लेटर अनालॉजी,नफा-तोटा,सरासरी, वेळ व घड्याळ इ.संबंधित प्रश्न विविध उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. प्रारंभी,समिती चेअरमन प्रा.शेख जे.यु.यांनी कार्यक्रमाचे पाहुणे प्रा.शिंदे डी.आर.यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा.शेख एन.एस. यांनी केले. कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी प्रा.रसाळ एन.एस.,प्रा. चव्हाण सी.डी.,प्रा.बंडगर एन.एच., प्रा.भानवसे डी.पी.व इतर सहकारी प्राध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

जय सेवालाल महाराजांची मिरवणूक

सोलापूर : बंजारा समाजाचे आद्यगुरू संत सेवालाल महाराज २८४ जयंतीनिमित्त गुरुवारी रोजी दुपारच्या सुमारास सात रस्ता येथील कारगीर पेट्रोल पंप उत्कर्ष हॉटेल येथून नेहरू नगर पर्यंत मोठ्या जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली. पारंपरिक बंजारा नृत्यसह, युवक-युवतींनी नाशिक ढोल तसेच डीजेच्या तालावर बहारदार खेळ सादर करीत शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. याप्रसंगी समाज बांधवानी जयघोषाने परिसर दणाणून सोडला. जय सेवालाल महाराज यांच्या प्रतिमीचे पूजन प्रतिष्ठापना भोग लावून माजी गृहमंत्री सुशील कुमार शिंदे, प्रकाश चव्हाण, अलका राठोड, अमोल बापू शिंदे, ऋतुराज बंटी राठोड, शिवाजी सावंत , रमेश चव्हाण, विनोद चव्हाण, मनीष काळजे, आमदार, सचिन कल्याणशेट्टी यांच्याहस्ते जयंती साजरी करून सुरुवात करण्यात आले.

वाढेगांवच्या नूतन उपसरपंचपदी दिघे

सांगोला : सांगोला तालुक्यातील वाढेगांव ग्रामपंचायतीच्या नूतन उपसरपंचपदी राष्ट्रवादी काँग्रेसचे सतीश आंबादास दिघे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. वाढेगांव ग्रामपंचायतीचे उपसरपंच राहूल हजारे यांचा एक वर्षाचा कार्यकाल संपल्याने त्यांनी आपल्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता. उपसरपंच पद रिक्त झाल्याने त्या एका जागेसाठी निवडणुक घेण्यात आली. वाढेगांव ग्रामपंचायतीच्या कार्यालयात लोकनियुक्त सरपंच नंदकुमार दिघे यांचे अध्यक्षतेखाली विशेष सभा बोलावण्यात आली या सभे प्रसंगी उपसरपंच म्हणून सतीश आंबादास दिघे यांचा एकमेव अर्ज दाखल झाल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे ग्रामविकास अधिकारी भारत चंदनशिवे यांनी घोषीत केले नुतन उपसरपंचपदी सतीश दिघे यांची निवड घोषीत होताच राष्ट्रवादी काँग्रेस युवा नेते योगेश दादा खटकाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

नगरोत्थान योजनेतील २१.७८ कोटींच्या कामांना प्रशासकीय मंजुरी

▶▶ शहरात विविध मूलभूत सोयी- सुविधांसाठी निधी ▶▶ भाजपाच्या प्रभागात निधीला दिले प्राधान्य

सुराज्य/सोलापूर

शासनाच्या नगरोत्थान योजनेअंतर्गत २१ कोटी ७८ लाख ४६ हजार ३८८ रुपयांच्या निधीची १३० कामे असलेल्या यादीला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे. निवडणुकीच्या दृष्टीने भाजपाला सुरक्षित आणि आकर्षित करणाऱ्या या यादीतील निधी आणि कामे मात्र सर्वाधिक प्रमाणात भाजपाच्या प्रभागांमध्ये देण्यात आल्याचे स्पष्टपणे दिसून आले आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षामध्ये शासनाच्या महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगररोत्थान योजना आणि अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधारणा योजनांमधील निधीची तरतूद जिल्हा नियोजन समितीकडून करण्यात आली. दरम्यान या योजनेत विविध कामे सुचविणाऱ्या याद्या महापालिकेकडे शहरातील भाजपाच्या दोन काँग्रेसच्या एक आमदारासह खासदार व इतरांची यादी मागवण्यात आली होती. आमदार, खासदार यांनी मिळून यापूर्वी ७४ कोटींची ४४१ कामे असलेली यादी दिली होती. मात्र सत्ताधारी आमदार खासदारांनी पालकमंत्र्यांच्या मदतीने महापालिकेकडून कामे छाटून अंतिम यादी मागविली होती. यानुसार सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत २१ कोटी ७८ लाख ४६ हजार ३८८ रुपयांच्या निधीची १३० कामे असलेली यादी अंतिम करून जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविली होती. या यादीला प्रशासकीय मंजुरी देण्यात आली आहे.

सोलापूर महापालिकेने सादर केली प्रस्तावासोबत कागदपत्रे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेंतर्गत १३० कामांची यादी मंजुरीसाठी शासन स्तरावरील जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठविताना प्रस्तावासोबत विविध कागदपत्रे सादर केली आहेत. यामध्ये शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विहित केलेली पाच सुधार कार्यक्रम राबविण्याबाबतचे करार पत्र, प्रस्तावित कामाची जागा ही महापालिकेच्या मालकीच्या जागेत व ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र, प्रस्तावित कामे मागील पाच वर्षात कोणत्याही योजनेतून झालेले नाही किंवा अर्थसहाय्य घेतलेले नाही याबाबतचे प्रमाणपत्र, प्रस्तावित कामे विकास आराखड्याशी सुसंगत असल्याबाबतचे प्रमाणपत्र, कामांसाठी कोणत्याही प्रकारचे न्यायालयात वाद किंवा न्यायप्रविष्ट नसल्याबाबतचे प्रमाणपत्र व इतर बाबींसह महापालिका ठरावाची प्रत यासह सादर केले आहे.

सोलापूर महापालिकेत सन २०१७ पासून भाजपाची सत्ता होती. मात्र भाजपातील दोन आमदारांच्या अंतर्गत गटबाजीमुळे त्यांच्या कार्यकाळातील नगरोत्थान आणि अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजना कामांच्या निधी याद्यांना इतर पक्षांपेक्षा पक्षांतर्गतच वाद चव्हाट्यावर आला होता. महापालिकेची गतवर्षी मार्चमध्ये मुदत संपली आणि राज्यात महाविकास आघाडी सत्ता असल्याने योजना निधी याद्या तयार केल्या त्याला मंजुरी मिळाली यानंतर पुन्हा या योजना याद्यांना राज्यात सत्तांतर झाल्यानंतर ब्रेक देऊन रद्द करण्यात आल्या. यामुळेही मोठ्या प्रमाणात ओरड झाली होती. यानंतर राज्यात सत्तेत असलेले बाळासाहेबांची शिवसेना या शिंदे गटातील प्रभागांमध्ये निधी आणि कामे देण्यात आली आहे. याव्यतिरिक्त इतर काही प्रभागात तोकड्या प्रमाणातील निधी कामे देण्यात आली असली तरी ती भाजपा इच्छुक कार्यकर्ते भागांमध्ये व त्यांनी सुचविलेल्याप्रमाणे आमदारांनी ती कामे नमूद केल्याचे स्पष्ट होत आहे.

महापालिकेला भरावा लागेल ६.५३ कोटींचा हिस्सा

शासनाच्या नगरोत्थान योजनेसाठी नगर अभियंता कार्यालयाने तयार केलेली कामाची यादी महापालिका प्रशासनाकडून अंतिम करून प्रशासकीय मंजुरीसाठी पाठविली. प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली एकूण २१ कोटी ७८ लाख ४६ हजार ३८८ रुपयांच्या कामासाठी शासन १५ कोटी २४ लाख ९२ हजार ४७२ रुपयांचे ७० टक्के अनुदान वितरित करणार आहे. तर उर्वरित ६ कोटी ५३ लाख ५३ हजार ९१६ रुपयांचा ३० टक्के हिस्सा महापालिकेला द्यावा लागणार आहे.

ऐन रब्बी हंगामात माळखांबी मायनर कॅनालवरील पिके जळाली

सुराज्य/वेळापूर

पाटबंधारे खात्याचा गलतन कारभार शेतकऱ्यांच्या मुळावर : महादेव ताटे

ऐन रब्बी हंगामात माळखांबी मायनर कॅनॉलवरील पिके जळाल्याने पाटबंधारे खात्याचा गलतन कारभार शेतकऱ्याच्या मुळावर आला असून शेतकऱ्यांना वेळेत पाणी देऊन न्याय न दिल्यास सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे यांनी पाटबंधारे खात्याच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

रब्बी हंगाम २०२२-२३ साठी अनेक शेतकऱ्यांनी पाटबंधारे खात्याकडे रीतसर पाणी मागणी केलेली असताना रब्बीचे दुसरे आवर्तन अद्याप न मिळाल्याने माळखांबी मायनर कॅनॉलवरील अनेक शेतकऱ्यांची पिके जळाली आहेत. रब्बी हंगामातील दुसरे आवर्तन वितरिका क्रमांक ४ डी फोर कॅनलला दिनांक २० जानेवारी २०२३ रोजी पाणी सोडलेले असून माळखांबी मायनर कॅनलला दुसरे आवर्तन ५ फेब्रुवारी २०२३ रोजी सोडले आहे डि फोर नंतर १६ दिवसांनी उशिरा माळखांबी मायनरला पाणी सोडलेले आहे. डी फोर कॅनलला गेली २८ दिवस पाणी चालू असून अनेक शेतकऱ्यांची मागणी नसताना कर्मचारी व अधिकारी यांचे हात ओले करून राजरोसपणे बेकायदेशीर काळाबाजाराने पाणी देत असल्याचा आरोप महादेवभाऊ ताटे यांनी केला असून याची चौकशी व्हावी. त्याचबरोबर डि फोरच्या अनेक फाट्यावर १० दिवस पाणी चालू असून सदर फाटे अद्यापही चालू आहेत. अनेक फाट्यावर विहिरी, तळी भरून घेतल्या जात असून राजरोसपणे मोकाट पाणी चालू असून पाटबंधारे खात्याचा त्यास कोणी वाली नसल्याचा चित्र दिसत आहे असा आरोप महादेवभाऊ ताटे यांनी केला आहे. याउलट माळखांबी मायनर कॅनलला मागील १२ दिवसापासून पाणी चालू असून पूर्ण क्षमतेने पाणी दिलेले नाही त्यामुळे फटा क्रमांक १ ते ८ पर्यंतच्या फाट्यास अद्याप पाणी मिळाले नसून ऐन रब्बी हंगामात हाता तोंडाशी आलेली पिके जळून शेतकऱ्यांचे पाणी मागणी करूनही नुकसान झालेले आहे. निरा कालवा वेळापूर शाखाधिकारी यांना संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता ते प्रतिसाद देत नाहीत अशा अधिकारी व कर्मचाऱ्यांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करून शेतकऱ्यांना न्याय देण्यात यावा अशी मागणी सावता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्ष महादेवभाऊ ताटे यांनी केली. असुन शेतकऱ्याला योग्य न्याय न मिळाल्यास पाटबंधारे खात्याच्या विरुद्ध आंदोलन करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पिलीव येथील महालक्ष्मी देवीच्या यात्रेस सुविधा उपलब्ध करुन देणार : आ. सातपुते

सुराज्य/पिलीव

पिलीव येथील महालक्ष्मी देवीचे हे मंदिर प्रसिध्द मंदीरापैकी एक असून याठिकाणी लाखो भाविक भक्त येतात. याठिकाणी रस्ता व पुलासाठी एक कोटी अकरा लाख रुपये निधी,पेव्हर ब्लॉक बसविणे ४० लाख रुपये व मंदिर परीसरात भक्त निवास व इतर सुविधा यासाठी २ कोटी रुपयांचा निधी याच अधिवेशनात मंजूर करुन घेणार असल्याचे आ रामभाऊ सातपुते यांनी सांगीतले.

माळशिरस तालुक्यातील महालक्ष्मी देवी यात्रा कमिटीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेती पिक प्रदर्शन व गझी ढोल स्पर्धेच्या आयोजित करण्यात आलेल्या बक्षीस वितरण प्रसंगी प्रमुख ते बोलत होते.

पाहुणे म्हणून माळशिरस तालुक्याचे आ रामभाऊ सातपुते, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर, सदगुरु साखर कारखान्याचे व्हा चेअरमन बाळासाहेब कर्णवर पाटील, माजी जि प सदस्य गणेश पाटील, यात्रा कमीटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील, व्हा चेअरमन लहु पाटील ,पिलीवचे सरपंच नितीन मोहीते, चांदापुरीचे सरपंच जयवंत सुळ,बचेरीचे सरपंच महादेव पाटील, शिंगोर्णीचे सरपंच अक्षय धांडोरे, सुळेवाडीचे सरपंच बापुराव करडे, उघडेवाडीचे सरपंच मोहन कचरे,भाजपचे राहुल मदने , सरपंच संग्राम पाटील यांच्या उपस्थितीत बक्षीस वितरण करण्यात आले.

यावेळी बाबुराव पाटील, आनंद पाटील, बाळासाहेब मदने, प्रकाश पाटील, संतोष शेंडगे,आबासाहेब पाटील, शिवाजी पिसे,कबीर माने,संजय पाटील, रघुनाथ देवकर, दामोदर लोखंडे, प्रमोद भैस, नितीन कपने,निशांत बगाडे,पठाणवस्तीचे सरपंच एजाज पठाण, यांच्यासह यात्रा कमीटीचे पदाधिकारी, यासह यात्रेस आलेले गावचे ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितीथांचे आभार चेअरमन बाबासाहेब पाटील यांनी मानले.

'द ब्रोकन टेबल' हा लघुपट प्रदर्शित

सोलापूर : रॉयल स्टॅग बॅरल सिलेक्ट लार्ज शॉर्ट फिल्म्सने त्यांचा द ब्रोकन टेबल' नावाचा नवीन लघुपट प्रदर्शित केला आहे.फिल्म निजा कंपनीची निर्मिती असलेल्या या लघुपटात अत्युत्कृष्ट अभिनेते नसीरुद्दीन शाह व रसिका दुगल यांच्या भूमिका आहे.

बोंडले येथे शिवजयंतीनिमित्त वृक्षारोपण

सुराज्य/वेळापूर

अखंड हिंदुस्तानचे आराध्य दैवत हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकारणारे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवप्रेमी कला क्रीडा सांस्कृतिक व बहुउद्देशीय मंडळाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी निलेश बागाव यांच्या हस्ते नारळ, पिंपळ, चिंच, वड, लिंब अशा ४० पर्यावरण पोषक वृक्षांचे रोपण करण्यात आले. या कार्यक्रमाला बोंडले सरपंच विजयसिंह माने देशमुख, माजी उपसरपंच लालासाहेब जाधव, डॉ. जयंत चव्हाण, सोसायटी संचालक धनाजी जाधव, व्यसनमुक्त संघाचे सुनील पाटील, गणेश जाधव, द्वारकेत जाधव, सागर जाधव, यांच्यासह ग्रामस्थ व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते. तसेच शिवजयंतीनिमित्त बोंडले येथे १९ फेब्रुवारी रोजी संयुक्त महासंचालक संभाजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या कार्यक्रमात शिवव्याख्याते प्राध्यापक तुकाराम मस्के पंढरपूर यांचे शिवचरित्रावर व्याख्यान होणार आहे. तसेच सायंकाळी बोंडले गावातून शिवजयंतीनिमित्त शिवप्रतिमेची मिरवणूक नियणार आहे. तसेच दिनांक २० फेब्रुवारी रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व कार्यक्रमांना बोंडले परिसरातील ग्रामस्थांनी, तरुणांनी सहभाग नोंदवून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन शिवप्रेमी कला क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

एफ.सी. बायर्न फुटबॉल कप स्पर्धेत सेंट जोसेफ हायस्कूल अव्वल

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद तसेच सोलापूर जिल्हा फुटबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने एफ. सी. बायर्न कप जिल्हास्तर फुटबॉल स्पर्धा उत्स्फूर्तपणे पार पडल्या.

या स्पर्धेमध्ये सेंट जोसेफ हायस्कूलचा संघ विजेता ठरला. तर इंडियन मॉडेल स्कूल (स्टेट बोर्ड) उपविजेता व इंडियन मॉडेल स्कूल या संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेमध्ये एकूण १६ संघांनी सहभाग घेतला होता. प्राविण्यप्राप्त खेळाडूंना जिल्हा क्रीडा अधिकारी नितीन तारळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षीरसागर, स्पर्धा प्रमुख गणेश पवार, संघटना सहसचिव किरण दुस्तकर, विनर्स फाऊंडेशनचे अध्यक्ष सम्यक मोहोळकर, सनी भोसले, सागर राठोड यांच्या उपस्थितीत ट्रॉफी, मेडल्स व प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. राज्यातून २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. त्यांना जर्मनी येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहे. या विजयासाठी सेंट जोसेफ स्कुलचे क्रिडा शिक्षक सनी भोसले यांनी अथक परिश्रम घेतले. सेंट जोसेफचे फादर गॉडविन सलडाणा यांनी स्कूलच्या सर्व खेळाडूंचे अभिनंदन केले.

स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी संघटनेचे पंच किरण दुस्तकर, प्रशांत जाधव, गाँस शेख, पंकज जाधव, अमर साळुंखे, प्रतीक स्वामी, राजू धुळगुंडे, राजू गायकवाड, सुशील बंडगर, रोहित मोरे, यांनी काम पाहिले. सूत्रसंचालन व आभार मैदानी मार्गदर्शक गणेश पवार यांनी केले.

> सेंट जोसेफ संघाचा कर्णधार वसंत वाघमोडे याने संपूर्ण स्पर्धेत सर्वाधिक ५ गोल केले. अंतिम सामन्यात ४ पैकी ३ गोल करित सेंट जोसेफ संघाला एकतर्फी विजय मिळवून दिला. त्याला गोलकीपर आर्यन देशमुख आणि इतर खेळाडूंनी मोलाची साथ दिली.

एमआयटीतर्फे १६व्या राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धेचे आयोजन

सुराज्य/पुणे

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे तर्फे एमआयटी डब्ल्यूपीयू समिट २०२३ या १६ व्या राष्ट्रीय पातळीवरील क्रीडास्पर्धे चे सोमवार, दि. २० फेब्रुवारी ते शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी या कालावधीत एमआयटी डब्ल्यूपीयू येथे आयोजन करण्यात आले आहे. २००४ या वर्षापासून या स्पर्धा घेण्यात येत आहेत.

या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सोमवार, दि. २० फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता एमआयटी डब्ल्यूपीयू कॅम्पस, कोथरूड , पुणे येथे होणार आहे. या समारंभासाठी महाराष्ट्राचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री गिरीश महाजन हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच, माजी भारतीय लॉन टेनिस खेळाडू व अर्जून पुरस्कार प्राप्त गौरव नाटेकर, सुप्रिसध्द भारतीय (ट्राय ॲथलॉन) ॲथलीट कौस्तूभ राडकर हे पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे असतील. तसेच एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड हे उपस्थित राहतील.

या समारंभात क्रीडा क्षेत्रात भरीव कामगिरी केल्याबद्दल भारतीय १०० मी. स्प्रिंट लिजेंड रमेश तावडे यांना एमआयटी-डब्ल्यूपीयू क्रीडा महर्षि पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

या स्पर्धेमध्ये क्रिकेट, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, फुटबॉल, बास्केटबॉल, टेबल टेनिस, लॉन टेनिस, कबड्डी, चेस, स्विमिंग, ई स्पोर्टस अशा एकूण ११ क्रीडाप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.या स्पर्धेसाठी करंडक,पदके व रोख रक्कम असे एकूण १५ लाख रुपयांची बक्षिसे व प्रशिस्तीपत्रक दिली जातील. सर्व साधारण विजेत्या संघाला करंडक व ५१ हजार रुपयांचे रोख बक्षिस दिले जाईल. प्रत्येक क्रीडाप्रकारातील विजेत्या संघाला करंडक, सुवर्ण पदक व रुपये ८ हजार ते ३० हजार रोख. याखेरीज उपविजेत्या संघाला करंडक, रौप्य पदक व रोख रक्कम रुपये ५ हजार ते १८ हजार देण्यात येणार आहे.

पारितोषिक वितरण

या स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवार, दि.२४ फेब्रुवारी २०२३ रोजी दुपारी ५.०० वा. माईर्स एमआयटी, पुणेच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात होणार आहे. या समारंभासाठी भारतीय लॉन टेनिस पट्टू व अर्जुन पुरस्कार सन्मानीत अंकिता रैना व प्रसिध्द भारतीय लॉन टेनिस प्रशिक्षक हेमंत बेंद्रे हे सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत.

एमआयटी डब्ल्यूपीयूचे कार्यकारी संचालक राहूल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून या वर्षी पासून या स्पर्धेत खाजगी विद्यापीठांनाही सहभागी करून घेण्यात येत आहे.या स्पर्धेत पुणे विभागातून ४० अभियांत्रिकी महाविद्यालये, उर्वरित महाराष्ट्रातून १०, इतर राज्यातील ३ महाविद्यालय, तसेच पुण्यातील १० खाजगी विद्यापीठे, महाराष्ट्रातून ४, बाहेरच्या राज्यातील ७ विद्यापीठे सहभागी होणार आहेत. एकूण २८ खाजगी विद्यापीठांचे व ५४ अभियांत्रिकी महाविद्यालयांचे एकूण सुमारे ४००० स्पर्धक भाग घेत आहेत. इतक्या व्यापक प्रमाणात खेळाडूंचा सहभाग असलेली देशातील ही एकमेव स्पर्धा आहे. अशी माहिती समिट राष्ट्रीय क्रीडास्पर्धे च्या आयोजन समितिचे विद्यार्थी प्रतिनिधी श्रृती देशमुख, कुशाग्र सूर्यवंशी, दिया कौल, आर्यन महाडिक आणि संवेद कुलकर्णी यांच्यासमवेत डब्ल्यूपीयूच्या सोशल इनिशिएटिव्ह चे संचालक डॉ. महेश थोरवे, क्रीडा संचालक प्रा.डॉ. पी. जी. धनवे, स्पर्धेचे सल्लागार मंदार ताम्हाणे, योगेश नातू व विलास कथुरे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

माळीनगर प्राथमिक शाळेत शालेय साहित्य वाटप

माळीनगर : दि सासवड माळी एज्युकेशन सोसायटी संचलित प्राथमिक शाळा क्रमांक २ माळीनगर येथे उत्तम भोसले आणि जोत्स्ना उत्तम भोसले यांच्या वतीने जोत्स्ना भोसले यांच्या आई सावित्रीबाई यांच्या स्मृतिदिना निमित्त शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. प्रारंभी ज्ञानज्योती , क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवाजी सावंत हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने जोत्स्नाताई भोसले यांनी आपले मनोगत व्यक्त केले . त्यामध्ये त्यांनी आपल्या जीवनामधील आईचे महत्व हे अनन्यसाधारण आहे असे सांगितले. आई-वडिलांची सेवा ही सर्वांनी केली पाहिजे असा सल्ला त्यांनी सर्व विद्यार्थ्यांना दिला . शाळेच्या वतीने मुख्याध्यापक जयसिंह कांबळे यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले.सहशिक्षिका वंदना बंडगर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

संत रोहिदास समितीच्या वतीने आदर्श माता समाजभूषण पुरस्कार

उत्तर सोलापूर : संत रोहिदास मध्यवर्ती जयंती उत्सव समितीच्या वतीने राष्ट्रवादीचे नेते सुधीर खरट मल यांच्या हस्ते,लोकमंगल ब्यंकेचे संचालक प्रल्हाद कांबळे, अभियंता संजय धनशेट्टी,शिवलाल हरलेकर,एड संतोष चौगुले,मनोज व्हणमारे,संस्थापक अध्यक्ष विठ्ठल व्हणामारे यांच्या उपस्थित संत रोहिदास महाराज यांच्या प्रतिमा पूजन करून करण्यात आले. कमल वायमारे, जिजाबाई सावरकर, कलावती धनशेट्टी, गिरजाबाई जेऊरकर, कांताबाई वायमारे, लक्ष्मीबाई लामतुरे, शरणमा हरळेकर, मल्लामा ईश्वरकट्टी, कलावती चाबुकस्वार, नागरबाई खाडे ह्यांना आदर्श माता,समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विविध स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या यामध्ये प्रथम व द्वितीय स्पर्धांकाना बक्षीस वितरण, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी संत रोहिदास चौकात बाकड्याचाही उद्घाटन करण्यात आले. प्रास्ताविक विठ्ठल कुमार यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अध्यक्षा विजाताई राऊत, कार्याध्यक्ष अनिता गवळी, उपाध्यक्ष महानंद शिंदे, सचिव पौर्णिमा धुळराव, सुवर्णा कांबळे, सुजाता बोमणे, लक्ष्मी व्हनमारे, गीता व्हनकोरे, विद्या कटक, अंबाबाई चाबुकस्वार, हर्षदा चव्हाण, अर्चना नरोटे, रेखा खाडे, सुवर्णा व्हनमारे, कल्पना भोसले ह्यांनी परिश्रम येतले. प्रभाकर शिंदे, श्रीनाथ दुर्गुंडि, हरिभाऊ वायमारे, संतोष खडके, यर राजा भवन, कोरे सुभाष, चौरे मल्लिकार्जुन दीक्षित, दीपक धारवाडकर, राजाभाऊ शिंदे, स्वामीराव माशाळे, शाखा अभियंता अशोक कांबळे, कल चंदू चाबुकस्वार, धोंडीबा वंजारे, उमेश वायमारे, चंदन कोकणे उपस्थित होते. सूत्रसंचालन शाहीर रमेश खाडे, व कुमारी भाग्यश्री वंजारे यांनी, आभार कौशल्य वंजारी यांनी मानले.

पिडीत कुटुंबाला न्याय व आर्थिक मदतीसाठी उपोषण : देडे

अक्कलकोट : पांगरी येथील फटाके स्पोटप्रकरणी तहसीलदार शेरखाने व त्यांचे सहकारी तलाठी बीडीओ, ग्रामसेवक यांना सह आरोपी करून पिडीत कुंटुबाला तात्काळ आर्थीक मदत मिळावी या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयच्या पुनम गेट येथे बेमुदत उपोषणास सुरू केले आहे. जोपर्यंत तहसीलदार शेरखाने व त्यांच्या सहकाऱ्यांना आरोपी करुन बडतर्फीची कार्यवाही होत नाही.तो पर्यंत हे उपोषण साखळी पध्दतीने सुरु राहील असे लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी आपल्या भाषणात बोलताना म्हणत होते. हे उपोषण पश्चीम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महादेव भोसले यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात तालुकाध्यक्षाच्या नेतृत्वाखाली हे उपोषण एकाच वेळेला सुरु करण्याचे लहुजी शक्ती सेना घोषणा आदेश महादेव महाराज भोसले यांनी लेखी आदेश देत माध्यमांना माहिती दिली. रोहीत खलसे, ता. अध्यक्ष शाम उडानशीवे, अनिल बनसोडे खंडु बनसोडे, सागर लोखंडे, दीपक खंडागळे, योगेश सोनवणे, राम कांबळे, सोमनाथ कसबे, सुनील रणदिवे, किरण क्षीरसागर तसेच पीडित कुटुंबाचे नातेवाईक सुखदेव बगाडे, रवी मगर, अजय मोहिते, प्रकाश गायकवाड, करमाळ्याचे संजय कदम, आनंद काबळे आदी सह कार्यकर्ते उपस्थीत होते.

नीरा नरसिंगपूरच्या धर्तीवर हत्तरसंग कुडलचा विकास होणार

● आमदार सुभाष देशमुख यांचे प्रयत्न यशस्वी ● जिल्हाधिकाऱ्यांसमोर प्राथमिक आराखडा सादर

सुराज्य/दक्षिण सोलापूर

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तरसंग कुडल या तीर्थक्षेत्राचा विकास निरा नरसिंगपूरच्या धर्तीवर होणार आहे. याचा प्राथमिक आराखडा जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आला आहे. हत्तरसंग कुडलचा विकास होण्याच्या दृष्टीने आमदार सुभाष देशमुख यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता अखेर त्याला यश आले आहे.

हत्तरसंग कुडलच्या विकासासाठी जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन भवन येथे बैठक घेण्यात आली. या बैठकीला आमदार सुभाष देशमुख यांच्यासह बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता माळी, जिल्हा कृषी अधिकारी बाळासाहेब शिंदे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी देवस्थानचे सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.



हत्तरसंग कुडलला अव्वल तीर्थक्षेत्र बनवणार :- सुभाष देशमुख

प्रशासनाने लवकरात लवकर सर्व बाबींची पूर्तता करून त्याचा अहवाल सादर करावा. यासाठी जास्तीत जास्त निधी केंद्र आणि राज्य सरकारकडून आपण मिळवू, हत्तरसंग कुडलला राज्यातील अव्वल तीर्थक्षेत्र बनवू असे आमदार सुभाष देशमुख यांनी सांगितले.

हत्तरसंग कुडलच्या नव्या आराखड्यामध्ये भीमा सीना संगम येथे स्कायवॉक बांधणे, टाकळी येथील मुख्य रस्त्यापासून ते कुडल संगमपर्यंत सिमेंट काँक्रीटचा रस्ता करणे, दळणवळणाच्या सोयी निर्माण करणे, तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी भक्तनिवास बांधणे, सभामंडप, व्यापारी गाळे बांधणे, नदी परिसरात बोटिंग सुरू करणे, भीमा नदीच्या बाजूस घाट बांधणे, पर्यटकांच्या मनोरंजनासाठी लेसर शो सुरु करणे, लहान मुलांसाठी चिल्ड्रन पार्क बांधणे, ज्येष्ठ नागरिकांसाठी उद्यान बांधणे, मंदिरा समोर कायमस्वरूपी हेलीपॅड तयार करणे, दुचाकी आणि चार चाकी वाहनांसाठी सुसज्ज असे वाहनतळ उभा करणे, टाकळी हायवेजवळ मोठा माहिती फलक उभारणे, टाकळी हायवेपासून ते मंदिरापर्यंत पथदिवे बसवणे यासह विविध बाबींचा समावेश होणार आहे. यावेळी आमदार सुभाष देशमुख यांनी तीर्थक्षेत्राचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी चित्रफीत काढावी, छोट्या बाबी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून घ्याव्यात या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी शैक्षणिक सहली काढाव्यात यासह विविध सूचना केल्या. जिल्हाधिकाऱ्यांनी प्रथम घ्यावयाच्या कामाला प्राधान्य द्यावे, प्रस्तावित कामांचे वर्गीकरण करावे, अंतर्गत येणाऱ्या जमिनीचे भूसंपादन करावे, पंढरपूर तीर्थक्षेत्राच्या धरतीवर प्रचार आणि प्रसार करावा, बांधकाम विभागाने लवकरात लवकर पूर्व गणक पत्रक सादर करावे यासह विविध सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

डॉक्टर व्यंकटेश मेतन यांनी हत्तरसंग कुडलची वेबसाईट काढावी या ठिकाणी गाईडची नियुक्ती करावी, मंदिरावर एक लघुपट करावा, परिसरात पुरातत्त्व संग्रहालय बांधावे यासह विविध सूचना केल्या.

वाहतुकीचे नियम पाळा अन्यथा कारवाई : बागाव

वेळापूर : वेळापूर पोलीस ठाणे वाहतूक शाखेची ४५ दिवसात ३ लाख ५० हजारहून अधिक दंडात्मक कारवाई तसेच ४५ दिवसात ८०० केसेस ८८हजार ३७० रुपये दंड वसूल केला आहे. वेळापूर येथे पंढरपूर-पुणे रोड तसेच अकलूज-सांगोला रोड या ठिकाणावरून वेळापूर या ठिकाणी वाहनाच्या बेशिस्तीमुळे अपघात होऊ नये तसेच वाहनधारकांनी नियमांचे पालन करावे, यासाठी वेळापूर पोलीस स्टेशनचे प्रभारी पोलीस अधिकारी निलेश बागाव यांनी वाहतूक शाखेचे अंमलदार पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ धिटे, पोलिस कॉ. सुरज कौलगे, पोलीस कॉ. सोमनाथ यलमार ्यांची नेमणूक करून वेळापूर हद्दीमध्ये नियमाचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जात आहे.

नामसंकीर्तन सभागृहास निधी देण्याची मागणी

आ.परिचारक यांचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांना निवेदन

सुराज्य/पंढरपूर

प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली असा नाट्यगृहाचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारकडून मंजूरी देवून सुरवातीला निधी उपलब्ध करून दिला. मंजूर झालेल्या निधीमधून सदर नाट्यगृहाचे बांधकाम काही प्रमाणात पुर्ण झाले आहे.

पंढरपूर शहरात नामसंकीर्तन सभागृह बांधकामाच्या कामास ऑक्टोबर २०१६ मध्ये महाराष्ट्र शासनाकडून मंजूरी मिळाली होती. सदर कामाची एकुण अंदाज पत्रकीय किंमत रू.३९.४७ कोटी होती.

परंतू मागील सरकारच्या अडीच वर्षाच्या कालावधीमध्ये व कोव्हिड काळात याकामास कोणत्याही प्रकरचा निधी उपलब्ध होवू शकला नसल्यामुळे नामसंकिर्तन सभागृहाचे काम गेली तीन वर्षापासून रखडलेले आहे. त्यामुळे सध्याच्या कामाच्या अंदाज पत्रकामध्ये वाढ झाली आहे. आता पर्यंत २५ कोटी इतका निधी पंढरपूर नगरपरिषदेस प्राप्त झालेला आहे. प्राप्त झालेल्या निधीतून झालेल्या कामाची बिले देणेत आलेली आहेत. राहिलेल्या सभागृहाचे काम पुर्ण करण्यासाठी अर्थसंकल्पकीय अधिवनेशनामध्ये निधीची तरतुद करावी यासाठी आ.प्रशांत परिचारक यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबई येथे भेट घेवून मागणी केली.प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्यातील नामंसर्कितन सभागृहाचे विद्युत व्यवस्था, ऑडिटोरियमच्या अंतर्गत भागातील व्यवस्थेची संबधित कामे, ड्रेनेज व्यवस्था, पाणीपुरवठा व्यवस्था, अंतर्गत रस्ते, लँडस्केपिंग इ. कामे करणेची असून त्याचे ब्लॉक इस्टीमेट ६९ कोटी इतके झालेले आहे. काम पुर्ण करण्यासाठी ४४ कोटी रूपये निधीची आवश्यकता आहे. प्रशांत परिचारक यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेवून अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये निधीची तरतुद करून द्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे केली.



शेतकऱ्यांची वीजबिल सक्तवसुली त्वरित थांबवा : कोगनुरे

सुराज्य/अक्कलकोट

पान मंगरूळ जिल्हा परिषद व इतर विभागातील शेतकऱ्यांचे विजतोडणी आणि वीजबिल सक्तवसुली त्वरित थांबवा अन्यथा शिवसेना आणि युवसेनेकडुन शिवसेना स्टाईलने उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा युवासेना तालुका युवाअधिकारी विश्वनाथ कोगनुरे यांनी केले.

पान मंगरूळ विभागातील शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे विजकनेक्शन विद्युत विभागाच्या वतीने कट करण्यात येत आहेत आणि शेतकऱ्यांकडून सक्तीने विजबिल वसुली मोहीम चालु आहे.

ही बातमी शिवसेना पदाधिकारी यांच्या कानावर आली आज तात्काळ शिवसेना जिल्हासंपर्क प्रमुख अनिल कोकीळ ,जिल्हाप्रमुख अमर पाटील,उपजिल्हाप्रमुख संतोष पाटील, तालुका प्रमुख आनंद बुक्कानुरे, युवासेना सोलापुर जिल्हासंपर्कप्रमुख उत्तम आयवळे,जिल्हायुवाअधिकारी बालाजी चौगुले यांच्या आदेशानुसार शिवसेना अक्कलकोट तालुका उपप्रमुख राजकुमार गुणापुरे,युवासेना तालुका युवाअधिकारी विश्वनाथ कोगनुरे,तालुका उपप्रमुख संतोष रत्नाकर, केगाव बु;चे शाखाप्रमुख श्रीशैल आहेरवाडी, शिवा संयटनेचे अक्कलकोट तालुका उपाध्यक्ष रविकांत कुरे, मल्लिकार्जुन भैरामडगी, शरणप्पा मडसनाळ,बसवराज कोळी, भिमशा गौडगाव यांच्या वतीने रितसर निवेदन दिलेला आहे

तरी यापुढेही अशीच विजतोडणी आणि सक्तवसुली चालु राहिल्यास शिवसेनेच्या वतीने शिवसेना स्टाईलने उग्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आलेला आहे.

तीर्थ येथे जल संजीवनी प्रकल्पाचे उद्घाटन

सुराज्य/अक्कलकोट

युनायटेड वे मुंबई संस्थेच्या अंमलबजावणीमध्ये आणि जॉन डियर इंडिया यांच्या अर्थ सहाय्यातून सुरु असलेल्या जलसंजीवनी प्रकल्पाचा उद्घाटन सोहळा आणि कृतीसंगम कार्यशाळा तीर्थ येथे संपन्न झाली. यावेळी प्रकल्पा अंतर्गत झालेल्या सामुदायिक जल शुध्दीकरण युनिटचा शुभारंभ, प्रकल्प फलकाचे अनावरण करण्यात आले. प्रकल्पामध्ये अक्कलकोट तालुक्यातील डोंबरजवळगे, बऱ्हाणपूर, हालहळळी (अ) आणि दक्षिण सोलापूर मधील तीर्थ या गावाचा समावेश आहे. प्रकल्पा अंतर्गत तीर्थ, डोंबरजवळगे आणि बऱ्हाणपूर सामुदायिक जल शुध्दीकरण युनिट बसवण्यात आले आहे.

या उद्घाटन सोहळ्या प्रसंगी दक्षिण सोलापूर आणि अक्कलकोटचे गटविकास अधिकारी अनुक्रमे बाळासाहेब वाघ आणि सचिन खुडे, युनायटेड वे मुंबई संस्थेचे उपाध्यक्ष अजय गोवले, मुख्य सल्लागार मुकेश देव, जलसंधारण अधिकारी समीर शेख, कृषी अधिकारी उमेश काटे, मंडळ कृषी अधिकारी शिवाजी यमूल, प्रकल्प कॉडीनेटर प्रिया काळे, तीर्थ सरपंच आम्रपाली वायमारे, डोंबरजवळगे सरपंच चिदानंद माळगे, बऱ्हाणपूर सरपंच शबनम पिरजादे, हालहळळी(अ) सरपंच विजयकुमार बिराजदार, तीर्थ चे ग्रामसेवक श्रीशैल स्वामी,सह चार गावचे ग्रामसेवक, कृषीसहाय्यक रोहित थोरा, जल संजीवनी प्रकल्प टीम आणि चार गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ आणि सचिन खुडे यांनी जल संजीवनी प्रकल्पा अंतर्गत झालेल्या उपक्रमाची पाहणी करून कौतुक केले. अजय गोवले यांनी युनायटेड वे मुंबई संस्था जल संजीवनी प्रकल्पाचे पुढील तीन वर्षातील कामाबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. या प्रसंगी दोन महिला बचत गटांना शेळीपालन व्यवसायासाठी अर्थसहाय्य देण्यात आले. त्या धनादेशाचे वाटप करण्यात आले. तीर्थ जिल्हा परिषद मराठी शाळेतील विद्यार्थांच्या यशाबद्दल मुख्याध्यापक संतोष साळुंके यांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक भीमाशंकर ढाले, आभार समूह संयटक अजिज तांबोळी आणि सूत्रसंचालन शिक्षक गौरीशंकर नरुणे यांनी केले.

डोंबरजवळगे येथे नाला रुंदीकरण आणि खोलीकरण

जल संजीवनी प्रकल्पामधील मृदा व जलसंधारण घटकांतर्गत डोंबरजवळगे येथे नाला रुंदीकरण आणि खोलीकरण कामाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी सरपंच चिदानंद माळगे, महालक्ष्मी जलसंधारण संस्थेचे अध्यक्ष हिमायत जमादार उपस्थित होते.

'टर्री' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

सोलापूर : उमेदीच्या काळात भविष्यकाळ सोबतीला येऊन आपल्या कौशल्यांना पैलू पाडण्यासाठी परिस्थितीशी दोन हात करणारया तरुणाईचे चित्र आपण सर्वत्र पाहतोय. काहीसं बेदरकार आयुष्य जगत,आपल्या स्टाईलचा टेरर स्वॅग' घेऊन अभिनेता ललित प्रभाकर टर्री' च्या भूमिकेतून सज्ज असून १७ फेब्रुवारीला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे.

बचेरी परिसरात चोरांचा धुमाकूळ, नागरिकांमध्ये भितीचे वातावरण

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील बचेरी येथे गेल्या चार - पाच दिवसांपासून चोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे यामुळे बचेरी गावासह परीसरातील नागरिक अक्षरशः रात्र जागुन काढत आहेत.वैशाली मगर यांच्या घरातुन दोन लाख रुपयांचे सोने चोरुन नेल्यानंतर तसेच त्यांची मोटारसायकल पेट्रोल संपल्यामुळे काही अंतरावर सोडून दिली.पण त्याच दिवशी विजय शिकारे यांची मोटार सायकल मात्र चोरटयांनी लंपास केली. गुरुवारी रात्री दोनच्या सुमारास बिरुदेव गोरड यांच्या घराजवळ चार चोर आले मात्र लोक जागे असल्याने तेथुन त्यांनी पळ काढला .त्यांनंतर पिलीव - बचेरी शिवेवर असणाऱ्या नंदु शिकारे यांच्या घराचा दरवाजा तोडत असताना आवाज आल्यामुळे नंदु शिकारे जागे झाले व त्यांनी खिडकी उघडुन पाहीले असता चारजण घराचा दरवाजा तोडण्याचा प्रयत्न करीत करत असल्याचे पाहील्यावर ते जोराने ओरडले असता चोरांनी तेथुन पळ काढला .चोरांच्या भितीमुळे बचेरी परीसरातील नागरिक अक्षरशः रात्र जागुन काढत आहेत. नागरिक थोडे सतर्क झाल्यामुळे गुरुवारी रात्री चोरट्यांच्या हाती काहीच लागले नाही.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार आठ ते दहा चोर असुन दोन गटाने ते फिरत आहेत. त्यांच्याजवळ शस्त्र व इतर हत्यारे सुध्दा आहेत त्यामुळे नागरिक जास्त च घाबरले आहेत.

सुराज्य Classified
सोलापूर

नोकरी विषयक

शेतात वस्तीवर राहून नर्सरी व गायींचे काम करणारे जोडपे पाहिजे. पगार १७००० महिना. दोन लाख वर्षाला. ९९२२००४२४२ गिरमे अकलूज.(१४०३२३)

विवाह विषयक

सर्व जातीधर्मातील प्रथम वधुवर, विधवा, घटस्फोटीत आंतरजातीय उच्च शिक्षित भरपूर स्थळे उपलब्ध. एकदाच नोंदणी करा. लग्न जुळेपर्यंत स्थळे उपलब्ध करून दिले जातील. श्री तुळजाभवानी वधू-वर सूचक केंद, तुळजापूर
संपर्क : 9763624364, 7410553871 (040323)

महाराष्ट्र मिलेट मिशनसाठी २०० कोटींची तरतूद

सुराज्य/मुंबई

राज्यातील पौष्टिक तृणधान्य उत्पादन क्षेत्रवाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देणे आणि त्या उत्पादनांना योग्य हमीभाव मिळेल, यासाठी राज्य शासन आग्रही आहे. त्यामुळे महाराष्ट्र मिलेट मिशनसाठी २०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना आर्थिक सक्षम करण्यासाठी हे मिशन महत्वाचे पाऊल ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगण येथे महाराष्ट्र मिलेट मिशनचा प्रारंभ मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते झाला. त्यावेळी ते बोलत होते. कृषी मंत्री अब्दुल सत्तार, शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर, उद्योग मंत्री उदय सामंत, आमदार सर्वश्री भरत गोगावले, आशिष जयस्वाल, प्रकाश सुर्वे, अण्णा बनसोडे कृषी विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, कृषि आयुक्त सुनील चव्हाण आदींची यावेळी व्यासपीठावर उपस्थिती होती.

शेतकरी आणि कृषि उद्योजकांचा सत्कार

यावेळी शेतीमध्ये पौष्टिक तृणधान्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या शेतकरी आणि कृषि उद्योजकांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये सोनू बांगारा (माळ, जि. ठाणे), किसन मोढवे (मर्दी, जि. ठाणे), काकड्या लहांगे (उज्जेनी, जि. पालघर), आनंता धिंडा (सातरोंडे, जि. पालघर), जानू कामडी आणि पद्माकर वाख ((मुसई, जि. ठाणे), तानाजी यादव (गमेवाडी, जि. सातारा), होरुसिंग ठाकरे (बंधारा, जि. नंदुरबार), प्रकाश गायकवाड (पिंसाळवाडी, जि. सातारा), बाजीराव चौरे (बाभूळणे, जि. नाशिक), निंगोजी कुंदेकर (शेवाळे, जि. कोल्हापूर), प्रमोद माळी (पिंपरखेड, जि.जळगाव), भामटा पाडवी ((खेडळे, जि.नंदुरबार), तात्यासाहेब फडतरे (समृद्धी ग्रो ग्रुप. राहाता, जि. अहमदनगर), महेश लोंढे (ग्रोझी ऑरगॅनिक भरडधान्य प्रक्रिया उद्योग, उरळीकांचन, जि. पुणे), शंतनू पाटील (मेलूप फूडस, सोलापूर), श्रीमती नीलिमा जोरवार (संचालक, कळसूबाई शेतकरी उत्पादक कंपनी, नाशिक), महेंद्र छोरिया (यश इंटरप्रायजेस, नाशिक), प्रसाद औसरकर (शहापूर, जि. ठाणे) आणि बारवी ग्रो शेतकरी उत्पादक कंपनी (पाटगाव, जि. ठाणे) यांचा समावेश आहे.

स्टॉल्सवर गर्दी

आजच्या या कार्यक्रमावेळी प्रांगणात ज्वारी, बाजरी, नाचणी यासह विविध तृणधान्यापासून बनवलेल्या पदार्थांचे स्टॉल्स लावण्यात आले होते. मंत्रालयातील अधिकारी - कर्मचारी आणि मंत्रालयात विविध कामांसाठी आलेल्या नागरिकांनी या पदार्थांची खरेदी केली.

समृद्धी ग्रो, पुणे, कळसूबाई मिलेट फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, नाशिक. एमटीडीसी आणि दादर केटरिंग कॉलेज, सावित्रीबाई फुले आदर्श प्रभाग संघ, नाचणगाव, वर्धा. आदर्श स्वयंसहायता महिला समूह, ताम्हाणे, रत्नागिरी. एव्हीपी फूडस स्टफ, शहापूर. साव्वी कुकीज, ऐरोली. बारवी ग्रो, मुरबाड. अग्रणी शेतकरी उत्पादक गट, कवठेमहांकाळ.

पवित्र अन्न प्रक्रिया गृहउद्योग, भिवंडी. जय भवानी महिला बचत गट, जव्हार. कृषी विभाग ठाणे अधिकारी- कर्मचारी महिला, कृषी विभाग भिवंडी, गणेश महिला बचत गट, कर्जत. श्रीयाज फूडस पनवेल. हिरकणी प्रभाग संघ, आदर्श महिला प्रभाग संघ, पालघर. प्रगती लोकसंचलित साधन केंद्र, शहापूर. सुसी फूडस् रायगड. स्वयंसिध्दा महिला स्वयंसहायता समूह पनवेल. प्रेरणा स्वयंसहायता महिला समूह, खालापूर. रत्नाई महिला समूह, खालापूर, श्री वैभव इंडस्ट्रीज, जळगाव, ओम नमोशिवाय महिला समूह, साक्री, धुळे, मिलूप फूडस, बार्शी. यशस्वनिी ग्रो प्रोड्यूसर कंपनी, बोरामणी, दक्षिण सोलापूर. शिवमुद्रा शेतकरी गट, मांडेदुर्ग, चंदगड, धनदाई महिला बचत गट, रोहा, रायगड आणि अरूणिका फूडस, धुळे यांचे स्टॉल्स होते.

सत्तासंघर्ष; पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडेच राहणार

सुराज्य/ठाणे

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचे प्रकरण सात न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे सोपवण्यात यावे अशी विनंती ठाकरे गटाकडून करण्यात आली होती. मात्र, ही विनंती सर्वोच्च न्यायालयाने राखून ठेवली असून पुढील सुनावणी पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे राहणार आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश डी.व्हाय. चंद्रचूड यांनी एक पानी निकाल वाचून दाखवताना पुढील सुनावणी २१ फेब्रुवारीपासून नियमित सुरू करण्यात येईल असे सांगितले.

अरुणाचल प्रदेश येथे झालेल्या सत्ता बदलाचे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात सुनावणीसाठी गेले होते. तेथे भाजपने काँग्रेसचे आमदार फोडून सरकार पाडले होते. त्यावेळी विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा ठराव असेल तर ते आमदारांना अपात्र करू शकतात, असा मुद्दा न्यायालयासमोर होता. विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा ठराव असेल तर ते आमदारांना अपात्र करू शकत नाही, असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. नबाम रेबिया नावाने हा निकाल प्रसिद्ध आहे. शिंदे गटाने याच निकालाचा आधार घेतला आहे.

कारण विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरोधात शिंदे गटाने अविश्वासाचा ठराव आणला होता. ईमेल करून हा ठराव आणला होता. त्यावेळी झिरवळ यांनी शिंदे गटाच्या आमदारांना अपात्र ठरवले होते. मात्र, नबाम रेबियाच्या निकालानुसार विधानसभा अध्यक्षांविरोधात अविश्वासाचा ठराव असेल तर ते आमदारांना अपात्र ठरवू शकत नाही, असा दावा शिंदे गटाने केला आहे.

मात्र, अशाप्रकारे विधानसभा अध्यक्षांविरोधात जर अविश्वास ठराव आणला. तसेच पक्षातील एक गट फुटून वेगळा झाला तर ते लोकशाहीसाठी घातक ठरू शकते. त्यामुळे नबाम रेबिया निकालाचा पुनर्विचार करण्यासाठी हे प्रकरण सुनावणीसाठी सात न्यायाधीशांच्या घटनापीठासमोर वर्ग करावे,

सत्तासंघर्षाची सुनावणी आता २१ फेब्रुवारीला

अशी विनंती ठाकरे गटाने सर्वोच्च न्यायालयात केली आहे. परंतु, नबाम रेबिया निकालाच्या पुनर्विचारासठी हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे पाठवायचे की नाही हे केवळ महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाच्या खटल्याच्या सुनावणीच्या गुणवत्तेवरच ठरवता येईल, असं सर्वोच्च न्यायालायने स्पष्ट केलं आहे.

गेल्या तीन दिवसांपासून सलग सुनावणी घेण्यात आली. यावेळी ठाकरे गटाने नबाम रेबियाचा दाखला खोडून काढला होता. नबाम रेबिया प्रकरणाचा महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाशी संबंध येत नसल्याचा दावा ज्येष्ठ वकिल कपिल सिब्बल यांनी केला होता. त्यामुळे याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने काल निकाल राखून ठेवला. आज या निकालाचे

सत्तासंघर्षाच्या सुनावणीत 'इंटरेस्टिंग' गोष्टी घडत आहेत : शरद पवार

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचं प्रकरण ७ सदस्यांच्या घटनापीठाकडे सोपवण्याची ठाकरे गटाची मागणी शुक्रवारी (१७ फेब्रुवारी) फेटाळली. तसेच पुढील सुनावणी २१ फेब्रुवारीला ठेवली. यानंतर अनेक राजकीय प्रतिक्रिया येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांना याबाबत विचारलं असता त्यांनी प्रतिक्रिया दिली. ते शुक्रवारी (१७ फेब्रुवारी) पुण्यात माध्यमांना दिलेल्या प्रतिक्रियेत बोलत होते. शरद पवार म्हणाले, सत्तासंघर्षाची पुढील सुनावणी मंगळवारी (२१ फेब्रुवारी) येऊ, असं सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याचं मी ऐकलं. मंगळवारी काय होतं ते बघुयात. सध्या इंटरेस्टिंग' घडतं आहे. आत्ता काय होईल हे सांगणं अवघड आहे.

वाचन करण्यात आले. आजच्या निकालाकडे सर्वांचं लक्ष लागून राहिलं होतं, कारण हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे जाणार असल्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. जर, हे प्रकरण सात न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे गेलं असतं तर याप्रकरणाचा अंतिम निकाल घेण्यास अजून सहा महिन्यांचा कालावधी लागू शकला असता, असं तज्ज्ञांकडून सांगण्यात आलं.

एक पानी निकाल वाचून झाल्यानंतर हे प्रकरण पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाकडेच राहणार असल्याचं सरन्यायमूर्ती चंद्रचूड यांनी स्पष्ट केलं. नबाम रेबियाचा दाखला घेत संपूर्ण सुनावणी पाच न्यायाधीशांच्या घटनापीठापुढेच होईल, असं सरन्यायाधीशांनी स्पष्ट केलं आहे. त्यामुळे याप्रकरणी आता पुन्हा २१ फेब्रुवारीपासून नियमित सुनावणी होणार असल्याचे सांगण्यात आले आहे. दरम्यान, २१ फेब्रुवारीपासून नियमित सुनावणी झाल्यास निकाल वेळेत लागण्याची शक्यता तज्ज्ञांकडून वर्तवण्यात आली आहे.

मार्चमध्ये होळी असल्याने त्याची सुट्टी मिळेल. आणि मे महिन्यात उन्हाळी सुट्टी लागू होतील. त्यामुळे होळीची सुट्टी वगळता याप्रकरणी फास्ट ट्रॅकवर सुनावणी झाल्यास एप्रिल महिन्यापर्यंत म्हणजेच उन्हाळी सुट्टी लागण्याआधीच निकाल लागण्याची शक्यता कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

४५३ भारतीयांना गुगलने कामावरून काढले

सुराज्य/नवी दिल्ली

सध्या जगभरात दिग्गज टेक कंपन्यांसह विविध क्षेत्रातील कंपन्या जागतिक मंदीचे कारण देत अनेक कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकत आहेत. यातच Google या दिग्गज टेक कंपनीने १२,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकण्याची घोषणा केली.

पुन्हा एकदा Google ने आपल्या कर्मचाऱ्यांची कपात केली आहे आणि महत्वाची गोष्ट म्हणजे गुगलच्या भारतातील युनिट्समधून कर्मचाऱ्यांना कामावरून काढण्यात आले आहे. गुगलने आपल्या भारताच्या युनिटमधील ४५३ कर्मचाऱ्यांची कपात केली आहे.

बिझनेस टुडेवर प्रकाशित झालेल्या बिझनेसलाईनच्या अहवालानुसार या ४५३ भारतीय कमर्चाऱ्यांना काढून टाकण्याची कारवाई गुरुवारी रात्री करण्यात आली आणि याची माहिती मेलद्वारे देण्यात आली. हा मेल गुगल इंडियाचे कंट्री हेड आणि उपाध्यक्ष संजय गुप्ता यांनी पाठवला आहे.

गुगलची मूळ कंपनी अल्फाबेटचे सीईओ सुंदर पिचाई यांची सहमतीही या मेलमध्ये नमूद करण्यात आली आहे.

अदानी प्रकरणामुळे भारताच्या विश्वासार्हतेला तडा

मोदींना उत्तर द्यावेच लागेल, अमेरिकन अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांची प्रतिक्रिया

सुराज्य/नवी दिल्ली

हिंडेनबर्ग रिसर्च संस्थेचा अहवाल आल्यानंतर उद्योजक गौतम अदानी यांना खूप मोठा झटका बसला. विरोधकांनी अदानी प्रकरणावरुन संसदेत गोंधळ घातला. संयुक्त संसदीय समिती स्थापन करुन चौकशी करण्याची मागणी केली. मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदींनी लोकसभा आणि राज्यसभेत केलेल्या भाषणांमध्ये अदानी प्रकरणावर एकही शब्द उच्चारला नाही. भारतातील उद्योगजगतही यावर काहीच बोललेलं दिसलं नाही.

आता मात्र अमेरिकेचे अब्जाधीश जॉर्ज सोरोस यांनी अदानी समूहाच्या प्रकरणावरुन मोदींवर निशाणा साधला आहे. सोरोस म्हणाले, 'मोदी अदानी प्रकरणावर मौन बाळगून आहेत. पण परदेशी गुंतवणूकदार आणि संसदेला त्यांना उत्तर द्यावेच लागेल.

जर्मनी येथे होत असलेल्या म्युनिक सुरक्षा संमेलनाच्या आधी जॉर्ज सोरोस यांनी म्युनिक विद्यापीठात एका कार्यक्रमात बोलत असताना सदर वक्तव्य केलेलं आहे. तसेच गौतम अदानी यांच्या अदानी समूहाने शेअर मार्केटला वेठीस धरल्यामुळे भारताच्या विश्वासार्हतेला कसा तडा गेला? यावरही भाष्य केले. जॉर्ज सोरोस हे ओपन सोसायटी फाऊंडेशन या संस्थेचे संस्थापक आहेत. त्यांची संपत्ती ८.५ अब्ज डॉलर्स एवढी आहे. लोकशाहीवादी, पारदर्शकतेला प्राधान्य, अभिव्यक्तीस्वातंत्र्यासाठी काम करणाऱ्या गटांना ते निधी पुरवत असतात.

अंमली पदार्थ तस्कर जाळ्यात, २३ लाखांचे कोकेन जप्त

सुराज्य/पुणे

अडीच वर्षे पोलिसांना गुंगारा देणारा अंमली पदार्थ तस्कर जेम्स डार्लिंगटन लायमो याला गुन्हे शाखेच्या अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून २३ लाख २६ हजार रुपयांचे कोकेन, तीन मोबाइल संच, दुचाकी जप्त करण्यात आले.

जेम्स मूळचा आफ्रिकेतील टांझानियाचा आहे. जेम्स अंमली पदार्थ तस्कर आहे. कोंढवा पोलीस ठाण्यात त्याच्याविरुध्द अमली पदार्थ तस्करीचा गुन्हा दाखल झाला होता. तेंव्हापासून तो फरार झाला होता.

या प्रकरणात जेम्सच्या मित्राला अटक करण्यात आली होती.

पोलिसांच्या पथकाकडून त्याचा शोध घेण्यात येत होता. तो दिल्लीत वास्तव्यास असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. दोन महिन्यांपूर्वी तो हांडेवाडीतील जाधवनगर भागात राहायला आला होता. याबाबतची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली. त्यानंतर त्याला सापळा लावून पोलिसांनी पकडले, अशी माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी दिली.

भूकंपबळींची संख्या ४१ हजारांवर

सुराज्य/नवी दिल्ली

टर्की आणि सीरियातल्या महाविनाशकारी भूकंपामुळे झालेल्या मृतांची संख्या थांबण्याचं नाव घेत नाहीये. शुक्रवारी सकाळपर्यंत मृतांची संख्या ४१ हजारांच्या पुढे गेली आहे. एकट्या टर्कीमध्ये ३८,०४४ लोकांचा मृत्यू झाला आहे. तर सीरियात आतापर्यंत ३,६८८ लोकांचा मृत्यू झाला आहे.

भीषण भूकंपानंतर जगभरातले

युएनकडून मदतीचे आवाहन

देश टर्कीच्या मदतीसाठी पुढे आले आहेत. संयुक्त राष्ट्राने देखील हे संकट दूर करण्यासाठी १०० कोटी डॉलर्स इतक्या मदतीचं आवाहन केलं आहे.

'एएफपी' या वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुरेटेस यांनी शुक्रवारी एक निवेदन जारी केलं आहे. या निवेदनात यांनी म्हटलं आहे की, गरजा मोठ्या आहेत, लोक त्रस्त आहेत, तर दुसऱ्या बाजूला आपल्याकडे वेळ कमी आहे. आपण जर इतकी मदत करू शकलो तर ५५ लाख लोकांना मदत मिळेल. मी आंतरराष्ट्रीय समुदायाला विनंती करतो की, आपल्या काळातील या सर्वात मोठ्या नैसर्गिक आपत्तींपैकी एक असलेल्या या आपत्तीमुळे पीडितांना मदत करण्यासाठी पुढे यावं.

...मग नार्वेकर योग्य कसे? : झिरवळ

सुराज्य/मुंबई

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर सर्वोच्च न्यायालयात तारीख पे तारीख मिळत असताना विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी यावर आपली प्रतिक्रिया दिली आहे. उपाध्यक्ष म्हणून नरहरी झिरवळ यांनी आमदारांना अपात्रतेची दिलेली दोन दिवसांची नोटीस अनधिकृत आहे. कमीत कमी दहा दिवसांची नोटीस द्यायला हवी होती, असा दावा शिंदे गटाकून करण्यात आला आहे.

या दाव्यावर बोलत असताना नरहरी झिरवळ यांनी नियमाचा दाखला देताना सांगितले, अपात्रतेची सात दिवसांपर्यंत नोटीस

दिली जाते. त्यांना दोन दिवसांची नोटीस दिली असेल तर त्यांनी माझ्याकडे मुदतवाढ मागायला हवी होती. तशी कायद्यात तरतूद आहे.

सात दिवसांच्या पुढेही त्यांना वेळ हवा होता, तर त्यांनी तो मागायला हवा होता. तसेच जर उपाध्यक्ष म्हणून माझ्यावर अविश्वासाचा ठराव आणला होता. तर मग माझ्या अध्यक्षतेखाली झालेली नव्या अध्यक्षांची निवडही चुकीची ठरते का? असा प्रश्न नरहरी झिरवळ यांनी उपस्थित केला आहे.

जितेंद्र आव्हाडांना जामीन मंजूर

सुराज्य/मुंबई

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार जितेंद्र आव्हाड यांना विनयभंग प्रकरणात दिलासा मिळाला आहे. ठाणे कोर्टाने त्यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

१५ हजारांच्या जातमुचलक्यावर जितेंद्र आव्हाड यांना जामीन मंजूर करण्यात आला आहे.

न्यायमूर्ती प्रणय गुप्ता यांनी हा निर्णय दिला. रिदा रशीद यांनी दिलेल्या तक्रारीवरून मुंब्रा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हा दाखल झाल्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी ठाणे कोर्टात धाव घेत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता.

अनधिकृत बांधकामांचे वाद विकोपाला

सुराज्य/ठाणे: ठाण्यात राजरोस बेकायदा बांधकामे उभी राहत असून राजकीय आशीर्वादामुळे अनधिकृत बांधकामांना अभय मिळत असल्याचे बोलले जात आहे. त्याचवेळी या बांधकामांना आळा घालण्याची जबाबदारी असणारे ठाणे महापालिकेचे अधिकारी आणि राजकीय नेते यांच्यात वारंवार अत्यंत हीन दर्जाची चिखलफेक सुरू झाल्याचे पहायला मिळत आहे. हे अंतर्गत वाद मारहाणीपर्यंत पोहोचले असून बेकायदा बांधकामांतून उद्भवणारे संघर्ष किती टोक गाठतील, याकडे आता लक्ष लागले आहे.

ठाणे महापालिकेत अतिक्रमणविरोधी विभागाची जबाबदारी असणारे महेश आहेर यांना बुधवारी सायंकाळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांकडून महापालिका मुख्यालयाबाहेरच मारहाण झाली.

सदर अधिकाऱ्यांच्या नावाने जी ऑडिओ क्लिप व्हायरल झाली होती, त्यातील संभाषण धक्कादायक होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे जितेंद्र आव्हाड यांच्या कुटुंबाविरोधात तिहार तुरुंगातील गुंडाला तैनात केले असल्याचा उल्लेख संभाषणात होता. मात्र ही क्लिप ऐकली नसून तो कुणाचा आवाज आहे, हे आपल्याला माहिती नाही, असे म्हणणे आहेर यांनी मांडले होते. आव्हाड यांच्या मतदारसंघातील बेकायदा बांधकाम तोडल्यामुळे व त्यांचे न ऐकल्यामुळे मारहाण झाली, असा आरोप आहेर यांनी तक्रारीत केला.

बासमतीच्या दरात घसरण

औरंगाबाद: गव्हाबरोबरच बासमती तांदळाच्या निर्यातीवर बंदीमुळे आणि यंदा उत्पादनही चांगले असल्यामुळे बासमती तांदळाच्या किमतीमध्ये शहरात क्विंटलमागे सुमारे २०० ते ७०० रुपयांपर्यंत

घट दिसून येत आहे. अर्थात, हा तात्कालिक परिणाम असू शकतो, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, नवीन तांदूळ बाजारात उपलब्ध झाला आहे आणि बहुतांश प्रकारच्या तांदळाची ४० ते ५८ रुपये किलोने विक्री होत आहे.

नवीन तांदूळ बाजारात उपलब्ध झाल्याने किंमतीवर परिणाम

साध्या तांदळाच्या किमतीतही किंचित घट झाल्याचे काही व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

फळांचा राजा यंदा चांगलाच 'भाव' खाणार

मोहर गळतीमुळे आंब्यांची आवक घटणार

सुराज्य/नाशिक

यंदा आंब्याला ऐन मोहर येण्याच्या काळात होणारे ढगाळ हवामान, काही भागात पडलेला अवकाळी पाऊस, पडणारे दाट धुके यामुळे मोहर गळण्याचे प्रमाण वाढले. यामुळे यंदा आंबा सर्वसामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेर राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. लोणची कैरीच्या बाबतीतही तशीच स्थिती आहे. सध्या नाशिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात हापूस, बदाम व लालबाग या आंब्यांची थोड्या प्रमाणात आवक होत आहे. त्यांना चढे दर मिळत आहेत.



उन्हाळ्यात आमरस, ज्यूस, आम्रखंड आदी बनविण्यासाठी आंब्यांना मागणी असते. अक्षय तृतीयेला प्रत्येक घरी आंबा लागतोच, त्या दिवशी आंबा खरेदीसाठी ग्राहकांची बाजारात गर्दी होत असते.

लोणचे बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणात कैऱ्या लागतात. लोणच्यासाठी गावठी कैऱ्यांना पसंती दिली जाते. त्यासाठी नाशिक जिल्ह्यातील अनेक भागांतून लोणच्यासाठी कैऱ्या विक्रीस येतात.

यंदा मात्र, आंब्यांना कमी प्रमाणात मोहर आला आहे. जो आला होता, त्यातील बहुतांशी मोहर सातत्याने बदलत्या वातावरणामुळे गळून गेला आहे. सध्या वातावरण ठीक असले तरी पुढील काळात काही अचानक बदल घडल्यास उत्पादन घटू शकते. आंब्याच्या हंगामाच्या शेवटी बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणारा तोतापुरी आंबा मागील वर्षी दुर्मिळ झाला.

बाजार समितीत आंब्याचे घाऊक दर (प्रति किलो)

बदाम - १२० ते १५० रुपये, लालबाग - १८० ते २२० रुपये, हापूस (केरळ) - ३५० ते ४०० रुपये, हापूस (देवगड) - ५ डझनची पेटी - ८ हजार रुपये. सध्या केरळ व देवगड येथील आंब्यांची आवक थोड्या प्रमाणात होत आहे. मागणीनुसार आंब्याच्या पेट्या नाशिकला येत आहेत. येत्या पंधरा दिवसांत कोकणातील आंब्यांची स्थिती स्पष्ट होऊ शकेल.- याकूब खान, फळ विक्रेते

'डबल डेकर'ला सर्व्हेविनाच मंजुरी

पीएमपीने केवळ प्रसिद्धीसाठी निर्णय घेतल्याचा आरोप

सुराज्य/पुणे

पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) संचालक मंडळाच्या बैठकीत गुरुवारी २० डबल डेकर बस घेण्यास परवानगी देण्यात आली आहे. मात्र, डबल डेकर चालविण्यासाठी निश्चित केलेल्या मार्गांचे सर्वेक्षणच अद्याप पीएमपीने केलेले नाही. संबंधित मार्गावर उड्डाणपूल, मोठी झाडे, फांद्या, ओव्हरहेड केबल आहेत का? याची माहिती अद्याप पीएमपी प्रशासनाला नाही. त्यामुळे कोणत्याही सर्वेक्षणावीना केवळ प्रसिद्धीसाठी हा निर्णय घेण्यात आला का? अशी शंका उपस्थित केली जात आहे.

मुंबईत नुकतीच ई-डबल डेकर प्रवाशांच्या सेवेत रुजू झाली आहे. त्यामुळे पुण्यातही पुन्हा

डबल डेकर धावणार असल्याची चर्चा सुरू होती. त्यानुसार पीएमपीच्या गुरुवारी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत नव्याने तीनशे बसच्या खरेदीला मान्यता देण्यात आली. यामध्ये २०० बस 'सीएनजी'वरील आणि १०० बस इलेक्ट्रिकवरील असतील. १०० इलेक्ट्रिक बसपैकी २० इलेक्ट्रिक बस डबल डेकर आहेत.

पुणे महापालिका १२ आणि पिंपरी-चिंचवड महापालिका आठ बस घेऊन देणार आहे. या बस निगडी-भोसरी, कात्रज-हडपसर बायपास, मनपा ते हिंजवडी (बाणेरमार्गे), कात्रज ते हिंजवडी अशा मार्गावर चालविण्यात येणार असल्याचे पीएमपीने सांगितले आहे. मात्र, यातील काही मार्गांचे अद्याप सर्वे क्षणच झालेले नाही.

शिवरायांचा पुतळा पश्चिम दिशेला उभारावा

नियोजन भवनातील बैठकीत शिवप्रेमींची मागणी

सुराज्य/सोलापूर

जुना पुणे नाका ते विजापूर रोडपर्यंत उड्डाणपूल होणार असल्याने छत्रपती शिवाजी चौकातील शिवरायांचा पुतळा स्थलांतरित करण्याचे नियोजन आहे. आता हा पुतळा उड्डाणपुलाच्या मध्ये नको तर पश्चिम दिशेला उभारावा, अशी मागणी शुक्रवारी शिवप्रेमींकडून लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत नियोजन भवनात झालेल्या बैठकीत करण्यात आली.

निधी कमी पडू देणार नाही : आ.देशमुख

कोणत्याही प्रकारचा अडथळा न होता छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्याच्या कामामध्ये निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही, अशी ग्वाही यावेळी आमदार विजयकुमार देशमुख यांनी दिली.

जागेबाबत आयुक्तांची चाचपणीची सूचना

या बैठकीत शिवप्रेमींनी सुचविलेल्या जागेवर शिवरायांचा पुतळा बसविण्यासाठी चाचपणी करावा, अशा सूचना यावेळी महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली.

नियोजित उड्डाणपुलाच्या कामाला भूसंपादन कामाला गती आली आहे. याचे जवळपास ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. पुढील काही दिवसांत उड्डाणपुलाच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा नक्की कुठे असावा याबाबत शिवप्रेमींच्या प्रतिक्रिया घेण्यासाठी शुक्रवारी नियोजन भवन येथे आ. विजयकुमार देशमुख, आ. समाधान अवताडे, महापालिका आयुक्त शीतल तेली-उगले, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगरअभियंता लक्ष्मण चलवादी, औरंगाबादचे आर्किटेक्चर धीरज देशमुख आदींची प्रमुख उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

यावेळी आर्किटेक्चर धीरज देशमुख यांनी नियोजित छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा हा बाळीवेस मार्गाकडे जाणाऱ्या रस्त्याकडील बाजूस घेण्याचे नियोजन केले होते, असे सांगत यावर शिवप्रेमींनी भूमिका स्पष्ट करावी अशी विनंती केली. यावर प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि शिवप्रेमींमध्ये जागा ठरवण्याच्या कारणावरून चर्चा झाली. याबाबत माहिती देताना छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे प्रमुख अमोल शिंदे यांनी सांगितले की, या बैठकीत शिवप्रेमींनी सद्यस्थितीत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याच्या पश्चिम दिशेकडील निराळे वस्तीच्या दिशेने जाणाऱ्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या विनायक लॉज, सुप्रभात हॉटेलच्या जागेवर पुतळा उभारावा, अशी एकमुखी मागणी केली. यासाठी नियोजित जागा संपादित करण्यासाठीची प्रक्रिया महापालिका प्रशासनाने राबवावी, भूसंपादनाचा योग्य मोबदला संबंधित बाधितांना द्यावा, पुतळा हा मोठ्या उंचीवर उभारण्यात यावा, अशा सूचनाही या बैठकीत करण्यात आल्या. दरम्यान या बैठकीत शिवप्रेमींची मते जाणून घेतल्यानंतर पुतळा नक्की कोठे करावा, याबाबत ठोस निर्णय झाला नाही, मात्र जागेची चाचपणी करण्याबाबत प्रशासनाला सूचना देण्यात आल्या. बैठकीला किरण पवार अमर पुदाले, संजय कोळी राजू सुपाते, पुरुषोत्तम बर्डे, नाना काळे ,दिलीप कोल्हे,अनंत जाधव, श्रीकांत यादगे, मनीष काळजे, माउली पवार, राजन जाधव, श्रीकांत डांगे, भाऊसाहेब रोडगे, विनोद भोसले प्रशांत इंगळे, सतीश कुदळे, जयवंत सलगर, संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष श्याम कदम, जैनुद्दीन शेख शशी थोरात, नीलेश शिंदे, शेखर फंड, नीलेश देवकते, दास शेळके आदी उपस्थित होते.

अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या ६५ लाभार्थ्यांची चिठ्ठीद्वारे निवड

प्रत्येकी एक लाख प्रमाणे ६५ लाखांचे कर्ज वितरण होणार

सुराज्य/सोलापूर

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळामार्फत थेट कर्ज योजना सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत आर्थिक व भौतिक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मंजूर अर्जदारांपैकी ६५ लाभार्थींची निवड चिठ्ठी पध्दतीने करण्यात आली असल्याची माहिती महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक आर. टी. शिंदे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी तथा लाभार्थी निवड समितीच्या अध्यक्षा शमा पवार, विशेष समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे सदस्य सचिव, अर्जदार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या निवड प्रक्रियेमध्ये ३२१ अर्जदारांमध्ये ६० पैकी ३२ महिला अर्जदार व एकूण २६१ पैकी ३३ पुरुष अर्जदार अशा प्रकारे एकूण ६५ अर्जदारांची निवड चिठ्ठीव्दारे करण्यात आली. तसेच निवड झालेल्या अर्जदारांपैकी कागदपत्रांची पूर्तता न करणाऱ्या व कर्ज योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक नसलेल्या अर्जदारानंतर कर्ज वितरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी, प्रतिक्षा सुची तयार करण्यात आली आहे.

यामध्ये महिला ६ व पुरुष ६ अशी प्रतिक्षा सूची असून प्रतिक्षा सुचीतील अर्जदारांची निवड सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. सूत्रसंचालन राहुल आळसांदे यांनी केले. कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य नितीन कांबळे यांनी केले. साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे कार्यालयीन सहाय्यक प्रशांत तेलंग यांनी आभार मानले.

आयुष्यमान भारत योजनेसाठी नागरिकांनी नोंदणी करावी : शिवतेजसिंह मोहिते-पाटील

अकलूज : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या महत्वकांक्षी आयुष्यमान भारत योजनेसाठी अकलूज परिसरातील १०० टक्के नागरिकांची नाव नोंदणी करून घेण्याचे आवाहन अकलूज ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी केले आहे.

अकलूज- माळेवाडी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या ३१ बूथ मधील प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक शुक्रवारी शिवकीर्ती बंगला येथे शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत आयुष्यमान भारत योजनेसंदर्भात बूथ प्रमुखांना मार्गदर्शन करण्यात येऊन १०० टक्के नागरिकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. यावेळी बोलताना शिवतेजसिंह म्हणाले, आयुष्यमान भारत ही योजना गोरगरीब नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण आहे. यामध्ये केंद्र सरकारकडून आलेल्या यादीनुसार नोंदणी केल्यानंतर प्रत्येक कुटुंबाला ५ लाखांपर्यंत मोफत उपचाराचा विमा मिळणार आहे. लवकरच आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हॉस्पिटलची संख्या वाढविण्यात येणार असल्याचेही शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी सांगितले. तसेच नाव नोंदणी साठी अकलूज- माळेवाडी परिसरात दहा ठिकाणी कॅम्प लावण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या बैठकीत भाजपा माळशिरस तालुका सरचिटणीस सुरज मस्के, शक्ती केंद्रप्रमुख स्वप्निल शहाणे, गणेश भिंगे, रोहित शेटे यांच्यासह ३१ बूथ वरील शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

धर्मवीर संभाजी तरुण मंडळातर्फे आज पाळण्याचा कार्यक्रम

सोलापूर : मराठा वस्ती येथील धर्मवीर संभाजी तरुण मंडळाच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाच्या वर्षीही शिवजयंतीनिमित्त शनिवारी १८ फेब्रुवारी रोजी रात्री ९ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांचा पाळणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मंडळाचे आधारस्तंभ तथा आयोजक अनंत जाधव यांनी दिली. या पाळणा कार्याक्रमाला १ हजार महिला भगव्या साड्या आणि भगवे फेटे अशा वेशभूषेत उपस्थितीत राहणार आहेत. हा कार्यक्रम झाल्यानंतर सर्व महिला छत्रपती शिवाजी चौकात होणाऱ्या पाळणा कार्यक्रमाला जाणार आहेत, असे जाधव यांनी सांगितले. यंदा धर्मवीर संभाजी तरुण मंडळाच्यावतीने तुळजाभवानी मातेचा देखावा करण्यात आला आहे. हा देखावा पाहण्यासाठी शिवभक्तांची गर्दी होत आहे.

सरकारी कामात अडथळा केल्याप्रकरणी एकाची मुक्तता

सोलापूर : अकोलेकाटी येथील ग्रामसेविका किर्ती अर्जुनराव वांगीकर यांना शिवीगाळ करत उलटसुलट बोलून सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकारणी आरोपी महादेव कोंडीबा पवार (रा.अकोलेकाटी) याची जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.आर. शिंदे यांनी निर्दोष मुक्तता केली. २९ डिसेंबर २०२२ रोजी ग्रामसेविका वांगीकर या काम करीत असतांना आरोपी महादेव पवार हा दारूच्या नशेत कार्यालयात जोरजोरात ओरडू लागला व उलटसुलट बोलून शिवीगाळ करत ग्रामसेविका वांगीकर यांच्या अंगावर येऊ लागला. घटनेबाबत ग्रामसेविका वांगीकर यांनी तालुका पोलिस स्टेशन येथे रितसर फिर्याद दाखल केली पी.एस.आय.बंडगर यांनी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.या प्रकरणाची सुनावणी जिल्हा व सत्र न्यायाधीश एस.आर.शिंदे यांच्यासमोर झाली. आरोपीच्या वकिलांनी मांडलेला युक्तीवाद ग्राह्य धरून कोर्टाने आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली. यात अभियोग पक्षातर्फे ॲड. आर.जे.बुजरे,तर आरोपीतर्फे अभिषेक गुंड व ॲड. मनोहर गोविंदे यांनी काम पाहिले.

बक्षी समितीच्या निषेधार्थ विविध संघटनेच्या कर्मचाऱ्यांचे जि.प.समोर आंदोलन

सोलापूर : जिल्हा परिषदेतील विविध संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुटी प्रशासनाने अमान्य केल्या आहेत. याच्या निषेधार्थ जिल्हा परिषदेतील विविध कर्मचारी संघटनांनी समित्यांच्या अहवालाची होळी करत बक्षी समितीचा निषेध करण्यात आला.

जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढ विरुध्द राज्य शासनास अहवाल दिल्याने शुक्रवारी दुपारी जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाच्या वतीने बक्षी समितीच्या प्रतीकात्मक अहवालाची होळी करण्यात आली. जिल्हा परिषदेत व पंचायत समितीमधील तीन व चार वर्गाचे कर्मचारी उपस्थित होते.

लिपिक वर्गीय कर्मचारी संघटना, दिव्यांग कर्मचारी संघटना व कास्ट्राईब कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी एकत्रित येत बक्षी समितीच्या अहवालाची होळी करत निषेध व्यक्त केला. यावेळी कर्मचारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेश देशपांडे, राज्य सरचिटणीस दिनेश बनसोडे, लिपिक वर्गीय कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, सरचिटणीस नागेश पाटील, अनिल जगताप, सचिन जाधव, लक्ष्मण वंजारी आदीसह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

कागदपत्रांची पूर्तता करुनही..

बक्षी समितीने सादर केलेला खंड दोनचा अहवाल राज्य शासनाने प्रसिद्ध केला आहे. त्यात जिल्हा परिषदेतील लेखा व लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुटी अमान्य करण्यात आले आहेत. वेतनत्रुटी बाबत बक्षी समितीसमोर आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर समितीने कर्मचाऱ्यांच्या वेतनत्रुटी अमान्य केला असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

कॉपीमुक्त अभियान राबवत नवा पुणे पॅटर्न तयार करा : राव

सोलापूर : दहावी, बारावी परीक्षेत केंद्रांवर कोणत्याही प्रकारचे गैरमार्ग प्रकार होऊ नयेत या करिता १०० टक्के कॉपीमुक्त अभियान सर्व सर्वांनी यशस्वीरित्या राबवावे. पुणे विभागाचा राज्यात नवा पॅटर्न करावा, असे आवाहन पुणे विभागीय आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (१२ वी) ची परीक्षा २१ फेब्रुवारी ते २१ मार्च या कालावधीत तर माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (१० वी) ची परीक्षा २ ते २५ मार्च या कालावधीत होणार आहे. शासनाच्या विविध विभागांच्या समन्वयातून परीक्षा कालावधीत परीक्षा केंद्रांवर होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी कॉपीमुक्त अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारचे गैरमार्ग प्रकार होणार नाहीत. याबाबत विद्यार्थी, पालक, शिक्षक, संस्थाचालक यांचे उदबोधन करण्यात येणार आहे. तसेच अभियानाबाबत जनजागृतीही करण्यात येणार आहे. हे अभियान यशस्वीपणे राबविण्यासाठी, परीक्षा सुरळीत व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी विभागनिहाय व जिल्हानिहाय भरारी पथक, दक्षता समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या जीवनातील दहावी, बारावी हा महत्वपूर्ण टप्पा असतो. या महत्त्वाच्या टप्प्यावर परीक्षा निकोप वातावरणात होणे, त्यातून शिक्षणाचा दर्जा उंचावणे यासाठी हे महत्वपूर्ण अभियान राबविण्यात येत आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी लोकप्रतिनिधी ते स्थानिक स्तरावरील सर्व घटकांनी सहकार्य करावे असे आवाहनही विभागीय आयुक्त यांनी केले आहे.

प्राणी संग्रहालयातील प्राण्यांना औषध सेवा मिळणार

सोलापूर : वर्षभरापासून प्राणिसंग्रहालयाची मान्यता कायम करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून धडपड सुरू आहे. प्राण्यांसाठी दवाखान्याच्या जागेचा वाद न्यायप्रविष्ट आहे, प्राणिसंग्रहालयाची मान्यता कायम करण्यासाठी दवाखाना उभारण्यास परवानगी द्यावी, अशी विनंती महापालिकेने न्यायालयात केली आहे.

तोपर्यंत प्राण्यांना डॉक्टर, औषध सेवा देण्यासाठी संबंधित विभागाला कार्यवाही करण्याचे आदेश दिले असल्याची माहिती आयुक्त शीतल उगले-तेली यांनी दिली. महात्मा गांधी प्राणिसंग्रहालय हे स्मॉल कॅटेगेरीतील आहे. त्याच्या क्षमतेनुसार केंद्रीय प्राधिकरणाने ४५ त्रुटी काढल्या होत्या. संग्रहालयाबाबतची मान्यता कायम करण्यासाठीच्या अपिलावर केंद्रीय प्राधिकरणाकडे झालेल्या सुनावणीत प्राण्यांसाठी अद्ययावत दवाखाना, किचन स्टोअर आणि सुरक्षा भिंतीची उंची वाढविणे या महत्त्वाच्या त्रुटी होत्या. त्यातील अत्याधुनिक दवाखाना वगळता इतर ९५ टक्के

कामे पूर्ण झाली आहेत. तर संग्रहालय परिसरात अत्याधुनिक दवाखाना, पोस्टमार्टेम विभाग उभारून प्राणिसंग्रहालयाची मान्यता कायम करण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु, जागेचा वाद न्यायप्रविष्ट आहे. या जागेवर कोणत्याही प्रकारची स्थगिती नाही. ही जागा नियमानुसार व कागदोपत्रीदेखील महापालिकेची असल्याने या जागेवर बांधकामास परवानगी द्यावी, अशी विनंती महापालिकेने न्यायालयाकडे केली आहे. तत्पूर्वी प्राणिसंग्रहालयाची मान्यता टिकविण्यासाठी प्राण्यांसाठी डॉक्टर व औषधे उपलब्ध करण्यात येणार आहेत. संबंधित विभागाला तसे आदेशही दिले असल्याचेही आयुक्तांनी सांगितले.

कृषी विभागाच्या मिलेट दौडला उत्सफूर्त प्रतिसाद

सुराज्य/सोलापूर

आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत महाराष्ट्र शासन कृषि विभागाच्या वतीने आयोजित मिलेट दौड, वॉकला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर यांनी दौडला हिरवा झेंडा दाखवला

आंतरराष्ट्री पौष्टिक तृणधान्य वर्ष चे औचित्य साधून समाजामध्ये ज्वारी, बाजरी, भगर, राजगिरा, नाचणी इत्यादी तृणधान्यांचे आहारातील सेवन वाढावे, यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशाने या मिलेट दौड, वॉकचे आयोजन केले होते. यावेळी मिलेट ऑफ द मंथ या संकल्पनेअंतर्गत फेब्रुवारी महिना ज्वारी तृणधान्याकरिता समर्पित असल्याने ज्वारी पिकाचे महत्त्व सांगणाऱ्या भित्तीपत्रकाचे व माहिती पत्रकांचे प्रकाशन मान्यवरांचे हस्ते करुन उपस्थितांना त्याचे वाटप करण्यात आले.

शिवाजी चौकपासुन चालू झालेली सरस्वती चौक , डॉ. आंबेडकर चौक, डफरीन चौक, हरिभाई देवकरण प्रशाला मार्गे होम मैदान येथे तिचा समारोप झाला. या वॉकमध्ये शहरातील सिद्धेश्वर प्रशाला, सेवासदन प्रशाला, एमआयटी कॉलेज केगावमधील सुमारे ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. वॉक सुरू असताना शालेय विद्यार्थी तसेच कृषि विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी पौष्टिक तृणधान्याचे महत्व सांगणाऱ्या

घोषणा देत जनजागृती केली. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी बाळासाहेब शिंदे, कृषि उपसंचालक आर. टी. मोरे, उपविभागीय कृषि अधिकारी जयवंत कवडे, प्रकल्प उपसंचालक आत्मा मदन मुकणे, जिल्हा परिषद कृषि विकास अधिकारी विवेक कुंभार, तंत्र अधिकारी चंद्रकांत मंगरुळे आणि व्ही. बी. दारकुंडे, तालुका कृषि अधिकारी मनीषा मिसाळ आणि रामचंद्र माळी आदि उपस्थित होते. यावेळी जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालयातील कृषि पर्यवेक्षक आर. के. कलबुर्गी आणि संजय बुरगुटे, कृषि सहाय्यक राहुल भोसले, तंत्र सहाय्यक नितीन माळी आणि सौरभ मोरे, लिपिक शिवाजी सुर्वसे, युवराज इंगोले व कृषि विभागातील सर्व क्षेत्रीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. बाळासाहेब शिंदे यांनी उपस्थितांचे आभार मानले

अंत्रोळीकर नगरात बंद घर फोडले

सुराज्य/सोलापूर

अज्ञात चोरट्याने अंत्रोळीकर नगरात बंद घर फोडून घरातील बेडरूम मधील ठेवलेले पाच ग्रॅम सोन्याची अंगठी, दहा तोळे चांदीचे अंगठी, पैंजण तसेच डीव्हीआर

असा ऐवज चोरून नेला आहे. ही घटना दि.१४ ते १५ फेब्रुवारी दरम्यान अंत्रोळीकर नगर भाग १ होडगी रोड सोलापूर येथे घडली. याप्रकरणी मुस्तफा मुर्तुज दंडू (वय-४१,रा. आंत्रोळीकर नगर,होडगी रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो.कॉ. बर्हिजे हे करीत आहेत.